रहस्यकथा




ई साहित्य प्रतिष्ठान

# Solar Eclipse

मिलिंद कपाळे

ई साहित्य प्रतिष्ठान

# Solar Eclipse

मिलिंद कपाळे

फोन : +९१- ८३९०४०५८००

पत्ता : की ४०३ Ashok Meadows, Hinjewadi Phase १, पुणे, ४११०५७

ब्लॉग : new-poet-on-block. blogspot. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: ६ ऑक्टोबर २०२३



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# परिचय



**मी मिलिंद कपाळे**, कल्याण इथे लहानाचा मोठा झालो. तिथल्या एका पुस्तक संग्रहालयाचा मी सभासद होतो आणि विविध पुस्तके वाचत असतांना, मृत्युंजय किंवा नारायण धारपांची पुस्तके ह्यातून मला एकंदरीत शौर्यकथा आणि थरारक कथांची गोडी लागली. १० इयत्तेपर्यंत माझे शिक्षण मराठी भाषेत झाले आणि विज्ञान शाखा निवडूनही माझी मराठी भाषेशी मैत्री टिकून राहिली. नोकरी करत असतांना मी मराठी लेख, कविता असे लिहीत असे. कोरोनाच्या काळात घरून काम सुरु असतांना बराच वेळ जवळ असल्यामुळे मी कथा लिहायला सुरुवात केली. त्या प्रयत्नातून ती... चा जन्म झाला.

माझ्या कथा लिखाणावर शेरलॉक होल्म्स, नारायण धारप ह्यांचा बराच प्रभाव असल्याचे दिसून येईल. मुखपृष्ठ माझ्या मुलीने निधीने काढलेले pencil sketch आहे. माझ्या कुटुंबियांना आणि काही मित्रांना कि कथा आवडली आणि त्यातून तिला छापावे असा निर्णय झाला.

समाजात वावरत असतांना आपण अनेक नवे प्रकल्प उभे राहतांना पाहतो. त्या प्रकल्पांमागे नेमकं काय घडते ह्याची एक सामाजिक आणि राजकीय घडामोडींची कहाणी आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती असतात. चांगले वाईट सगळेच

लोक आपल्या सभोवताली असतात आणि प्रत्येकाचा दृष्टीकोण वेगळा असल्या कारणाने एकाच गोष्टीचे अनेक अर्थ निघू शकतात. ती... मधली नायिका तिचा दृष्टिकोण बाजूला ठेवत सत्य काय आहे त्याचा शोध घेत कसा न्याय मिळवून घेते त्याची हि कहाणी आहे. गोष्ट रहस्यमय आहे आणि ती वाचकाला गुंतुवून ठेवेल अश्याप्रकारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दोषी कोण आणि चांगले कोण का प्रश्न सतत भेडसावत राहील आणि त्यासाठी सलगपणे वाचून संपवण्याची इच्छा वाचकांमध्ये वाढेल. कथा कंटाळवाणी ना होता शेवटपर्यंत रंजक राहील ह्याचा कटाक्षाने प्रयत्न केलेला आहे. वाचकाला खऱ्या प्रसंगांची आठवण करून देणारी वास्तवादी अशी हि कहाणी आहे.


मी आपल्या समोर जे सादर करत आहे, ते गोड मानून घ्यावे आणि वाचून जी काही समीक्षा करावयाची आहे, ती वाचकांनी करावी ही नम्र विनंती. आपल्याला आवडले, नाही आवडले, काहीही असो, कळवावे ही सादर विनम्र विनंती... धन्यवाद!

मिलिंद कपाळे

फोन : +९१- ८३९०४०५८००

माझे या आधीचे पुस्तक. “ती”.

(वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा)




Solar Eclipse
मिलिंद कपाळे

# 1. The Shakehand

"ए चिंगूस...अरे दे कि पैसे..टेनिस बॉल आणायचे आहेत" गण्या म्हणाला. हेमण्या म्हणाला " अरे जाऊ दे रे गण्या, तो पैसे वाचवून सावकार होणार आहे. मग आपल्याला व्याजाने पैसे देईल तो". पक्या आणि गण्या टाळी देऊन हसायला लागले. अरविंद अभ्यास करता करता खिडकीतून हे सगळं पाहत, हसत होता. अप्पा म्हणाले, " अरविंदा अरे अभ्यास कर रे बाळा. तुझं आणि त्यांचं नशीब वेगळं आहे. आपल्याला इतक्याश्या गोष्टीसाठी खूप कष्ट करावे लागतात". अरविंद मनात म्हणाला, "मला पण हे असं सदा आनंदी आणि उत्साही जगायचं आहे. हसत खेळत आयुष्य काढायचं आहे. पटकन अभ्यास करतो आणि मी पण जातो खेळायला." एक तासाने ते पाच जण मैदानात क्रिकेट खेळू लागतात. अरविंदला ते सगळे "ए स्कॉलर", "ए स्कॉलर" म्हणत होते. अप्पा आणि माई हिशोब करत होते, पुढच्या वर्षी फी वाढेल शाळेची, इतरही खर्च वाढत आहेत. माई म्हणाल्या "मी काय म्हणते, करू देत ना मला दुकानात नोकरी. तेवढेच फी चे पैसे निघतील." अप्पा म्हणाले " तुला तो सरनाईक कसा आहे ते माहित आहे ना. का आपण विषाची परीक्षा घ्यायची. तु जरी त्याच्या दुकानात प्रामाणिकपणे काम करशील तरीही तिथे आजूबाजूला जे व्यवहार होतात त्यात आपण कळत नकळत गुंतत जातोच. पार्टी ऑफिस मधले सगळे टवाळखोर लोक त्या दुकानात बसून असतात दिवसभर कधी कधी. आपण दुसरा काही तरी पर्याय शोधूया "

गण्या आणि मित्र सरनाईकांच्या ऑफिसमधून बॅनर्स चे गठ्ठे घेऊन बाहेर पडतात. दिवसभर ते आजूबाजूच्या परिसरात बॅनर्स लावून थकून संध्यकाळी परत येतात. अरविंद त्यांना शाळेतून बघत विचार करतो.."अरे..हे पठ्ठे शाळेत कधी जातात आणि कधी शिकतात? मला का एवढी मेहेनत करावी लागते आणि हे कसे दर वेळी पास होऊन पुढच्या इयत्तेत जातात? संध्याकाळी हणम्याला अरविंद विचारतो, "आज कसा गेला शाळेत वेळ?, हणम्या म्हणतो " अरे आज आम्हाला साहेबांनी बाहेरचे काम सांगितले होते. आणि शाळा काय साहेबांचीच तर आहे. आपल्याया पप्पानी सांगितलं आहे, सरनाईक म्हणजे देव माणूस. देव जे सांगेल ते करायचं बाकी सगळं आपोआप ठीक होतं. आज जाम थकलोय, येतोस का मिसळ खायला"? अरविंद म्हणाला " नाही रे, अभ्यास करायचाय, उद्यापासून परीक्षा आहे". घरी जात जात अरविंद विचार करू लागला : 'साहेब देव माणूस आहेत तर अप्पा का त्यांना तसं समजत नाहीत? ' घरी गेल्यावर अप्पा आणि माई खूप आनंदात होते. "घे अरविंद पेढे घे. तुला टाटा स्कॉलरशिप मिळाली आहे. आता तुझा अभ्यासाचा खर्च ते उचलणार, बघ असे असतात चांगले लोक. जे होतकरू मुलांना शिकता यावं म्हणून त्यांचा खर्च उचलतात. नाहीतर काही असतात नेते.. जे मुलांना कामाला लावतात लहान वयात. आपण पुढल्या वर्षी शहरात जाऊन राहूया. मला तिथे चांगली नोकरी पण मिळाली आहे आणि तुझं CBSC शाळेत शिक्षण पण चांगलं होईल. बघ माई मी म्हणत होतो ना.. देव सगळं चांगलंच करतो " अप्पा खूप आनंदात म्हणाले. अरविंद विचार करू लागला : 'हेमण्याचा देव आणि आपला देव वेगळा कसा? आपला देव मेहेनत करून प्रसन्न होतो आणि त्याचा देव दिवसभर पार्टीची कामं करून'. अरविंदला त्याच्या मित्रांपासून दूर जाऊन खूप दुःख्ख होणार

होतं आणि ते त्याच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होते. तो खिडकीतून बाहेर पहात होता. अप्पा म्हणाले " बाळा मला कळतंय, पण तुला तिकडे लगेच नवे मित्र भेटतील. काळजी नको करुस. सगळं ठीक होईल"

१५ वर्षांनी...अरविंद इंजिनीरिंग आणि MBA करून आज त्याच्या आवडत्या कंपनी मध्ये रुजू व्हायला जात होता. Dreams Realty Ltd. पहिला दिवस म्हणून माई ने दही साखर देऊन त्याला आशीर्वाद दिला. "खूप यशस्वी हो" अप्पा आज फारच खुश होते. अभिमानाने त्यांना भरून आले होते. अरविंदला घट्ट मिठी मारून ते म्हणाले "बाळा सार्थक केलंस रे. यशस्वी हो"

कंपनीच्या त्या भव्य गगनचुंबी इमारती कडे पहात अरविंद म्हणाला... जिंदगी आ रहा हूँ मैं!!!

आज पहिलाच दिवस आणि कंपनीचे मालक नेमके आले होते सगळयांना भेटायला. अरविंदच्या बॉस नि त्याची ओळख करून दिली. गोविंदराव हा अरविंद, आजच जॉईन झालाय. खूप टॅलेंटेड आहे. गोविंदराव आणि अरविंद ह्यांची नजरानजर झाली आणि अरविंद लगेच म्हणाला...अरे गण्या तू..गोविंदराव ने पण ओळखलं. "आरु...अरे कसा आहेस?" दोघांच्याही डोळयासमोर ते जुने दिवस चलचित्रासारखे उभे झाले. त्यांचा handshake लांबला आणि गोविंदराव म्हणाले " चल माझ्या ऑफिस मध्ये चल" अरविंदला मोठा झटका बसला 'हा गण्या ह्या कंपनीचा मालक??'. भिंतीवर सगळी डिग्री सर्टिफिकेट्स आणि अवॉर्ड्स होते. यंग अचिव्हर आणि बरेच काही. अरविंदनी विचारले, " तू हे सगळं इतक्या लवकर कसं केलंस?" गोविंदराव म्हणाले  "सगळी देवाची कृपा" अरविंद म्हणाला "ह्मणजे त्या सरनाईकची का?" गोविंदराव बाहेर नजर टाकून म्हणाले "डेप्युटी CM संकेत

सरनाईक साहेब म्हण रे. ते आहेत म्हणून आपण आहे" अरविंद विचार करू लागला ' मी आजही चिंतेत आहे आणि आजही गोविंद मजेत आणि उत्साहात. अगदी ते लहान असतांना होते तसे' गोविंदराव म्हणाले "इथे मला please गोविंदराव म्हण. आणि घरी भेटायला येत जा मी बोलावलं कि" अरविंद म्हणाला "का नाही? बाकि हेमण्या, पक्या आणि चिंगूस कसे आहेत?" गोविंदराव म्हणाले" म्हणजे हेमंतराव साळुंके आणि प्रकाशराव सरदेसाई, मजेत आहेत. चिंगूस अजून तसाच आहे. चल मला निघायला हवं. तू आता आला आहेस तर मला इथल्या प्रोजेक्ट्स ची चिंता नाही. अप्पा आणि माईंनी तुला चांगलंच वाढवलं असणार. तुला मी काही आगामी प्रोजेक्ट्स देतो हॅन्डल करायला. भेटूया लवकरच" पुन्हा एकदा Handshake करून गोविंदराव झप झप तिथून निघून गेले. अरविंद दूरवर झळाळणारा सूर्य पाहून स्वतःशीच 'चला कामाला सुरुवात करूया...' म्हणून तेथून निघून गेला.

*दोन व्यक्ती फोनवर बोलत आहेत. रात्र असल्यामुळे धूसर प्रतिमा दिसत आहेत. एक म्हणतो " साहेब तुमच्या Solar Eclipse मधल्या सूर्याचा पत्ता लागला. फोटो पाठवलाय" दोन म्हणतो "नक्की ना. नंबर दोन." एक म्हणतो " हो साहेब, नक्की नसलं तर सांगितलंच नसतं ना तुम्हाला" दोन म्हणतो " ठीक आहे. तुला तुझे पैसे मिळतील. अजून काही लागे बांधे लागतात का ते सांग. सूर्य जर हा असेल तर ह्याच्या खाली कमीतकमी ३-४ पायऱ्या असतील आणि व्याप पण खूप मोठा असेल. मी बघतो फोन टॅप करता येतो का ते"*

*एक म्हणतो " साहेब मी चौकशी करतो कि सूर्याचा उगम कुठून झालाय ते. कदाचित काहीतरी माहिती मिळेल. मग एक एक पायरीवर कोण कोण आहेत ते काळात जाईल." दोन म्हणतो " सांभाळून. चौकशी म्हणजे भिंतीवरच्या माशीसारखी कर. मच्छरांसारखी गुण गुण करून नाही. नाहीतर अडकशील"*

*एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 2. The Shock

अरविंद त्याच्या केबिन मधे विचारात गुंतलेला होता. त्याच्या समोर काही फाइल्स आणि एक मॉडेल आहे. आज ह्या प्रोजेक्ट ला मंजुरी मिळावी म्हणून तो महत्वाच्या काही व्यक्तींना आणि शासकीय कर्मचाऱ्यांना भेटणार आहे. मनातले विचार तो एखाद्या क्रमाने लावायचा प्रयत्न करत आहे. त्याचा बॉस येतो आणि म्हणतो "झाली का तयारी?" त्यावर अरविंद म्हणतो "सर आपण त्यांना पंचतारांकित हॉटेल ऐवजी आपल्या प्रोजेक्ट च्या जमिनीवर भेटलो तर?" मला त्यांना आजूबाजूचा परिसर दाखवून, त्यांच्या डोळ्या समोर हे प्रोजेक्ट उभं करायचं आहे. AC रूम मधे बसून प्रेसेंटेशन मला जरा अनैसर्गिक वाटतं." बॉस म्हणाले "काही हरकत नाही, हेही करून पाहू. आपण त्यांना Live Feel देऊ शकतो. ते नाराज वाटले तर लगेचच हॉटेल वर जाऊन जेवण करत बोलूही शकतो."

अरविंद आणि त्याचा बॉस, इतरांना घेऊन site वर जातात. अरविंद आजूबाजूच्या परिसराबद्दल आणि हे प्रोजेक्ट..त्या परिसराचा कसा विकास घडवून आणेल त्याबद्दल अगदी उत्साहाने आणि जिव्हाळ्याने बोलतो. जणू काही त्याचं स्वतःचं घर तो बांधत आहे. एका एका प्रश्नाचं तो मुद्देसूद आणि सविस्तर उत्तर देतो.पूर्ण प्रोजेक्ट ची एकाच वेळी पूर्ण परवानगी न मागता तो म्हणतो तुम्ही टप्प्याटप्प्याने काम जसं होईल तशी पुढे जायची परवानगी द्या. भूमिपूजनाला आम्ही नेते किंवा सेलिब्रिटीऐवजी रिटायर्ड कमिशनरना बोलावणार आहोत. तेही बरेच प्रश्न विचारतील आणि मला खात्री आहे प्रोजेक्ट पाहून ते खुश होतील आणि तयारही होतील. तुम्हाला काहीही शंका असतील तर मला आजपासून विचारणं सुरु करा.

त्या visit नंतर प्रोजेक्ट ला सगळया बाजूने संमती मिळते आणि जसे जसे काम जोमाने पूर्ण होऊ लागते  तसे तसे अरविंद ज्या ज्या प्रोजेक्ट मधे हात घालत असे त्याच्या परवानगीसाठी तो अधिकाऱ्यांना सर्वात पहिल्या प्रोजेक्ट वर घेऊन येई आणि नंतर प्रोजेक्ट च्या site वर घेऊन जाई. पुढच्या सहा महिन्यात चार मोठे प्रोजेक्ट्स कंपनीला त्याने मंजूर करवून दिले. स्वतःहून sites वर राहून त्याने सगळं काम चोख होतंय का, कामगार खुश आहेत का, त्यांने पैसे त्यांना वेळेवर मिळत आहेत का. पैसे सगळया suppliers ला वेळेवर मिळत आहेत का, ह्या सगळयाची स्वतःहून शहानिशा करत तो एक एक प्रोजेक्ट सांभाळत होता. त्याची हि प्रगती पाहून गोविंदराव एकदा त्याला भेटायला ऑफिस मधे आले. अरविंदला शुभेच्छा देऊन ते म्हणाले "वाघ निघालास तू!! लहानपणी आम्ही तुला स्कॉलर म्हणायचो ते अगदी बरोबरच होतं. आजपासून तू मला गोविंद म्हणत जा आणि मला तुझा मित्र समज" अरविंद हसून म्हणाला, "नक्की ना, नाहीतर मग म्हणशील राव म्हण बाहेर गेलास कि" गोविंद म्हणाला "नाही रे मित्रा, इथे इतरांना असं वाटू नये कि तू  माझ्या ओळखीमुळे रुजू झाला आहेस म्हणून मी आधी तसं म्हटलं. आज हि मैत्री तू तुझ्या चांगल्या कामाने कमवली आहेस" अरविंग म्हणाला "बरं, मित्र म्हणून सांग, तू आपल्या त्या गावा पासून सुरुवात करून,  इतक्या मोठ्या कंपनीचा मालक कसा झालास?" गोविंद म्हणाला " मला वाटतच तू हे विचारणार.. उत्तर सोपं आहे. सरनाईक साहेब जे जे काम मला देत गेले ते मी पूर्ण करत गेलो. त्यांना जमिनीत आधीपासूनच खूप interest होता. त्यांनी आणि त्यांच्या आबांनी बरीच जमीन इकडे तिकडे विकत घेऊन ठेवली होती. ते पूर्णपणे राजकारणात जाण्याआधी मला म्हणाले, तू आता ह्या जमिनींना सांभाळ. तुला जे ठीक वाटेल ते कर. आम्हा चार

जणांचं सगळं शिक्षण आणि इतर गोष्टी त्यांनी सांभाळल्या होत्याच. ही सगळी सर्टिफिकेट्स मला कुठल्याही शाळेत किव्वा कॉलेज मधे न जाता मिळाली. मी त्यांचा वापर करून financer गोळा केले आणि Dreams जन्माला आली" अरविंद म्हणाला " खूप छान प्रवास आहे. मी पण खूप मेहेनत केली आणि शिकलो, परंतु आज मी तुझासाठी काम करतोय." गोविंद म्हणाला. " मित्रा.. आपण सगळेच आपल्या आपल्या नशिबातल्या आयुष्यासाठी काम करतोय. तू तुझं काम करत रहा. मला ह्या कंपनीला खूप वरच्या शिखरावर उभं झालेलं पहायचं आहे." त्यांच्या गप्पा सुरु असतांना अचानक घाईघाईत अरविंदचा बॉस आला आणि गोविंदला म्हणाला " साहेब TV लावा, बातमी आहे एक" TV वर चिन्मय च्या अचानक झालेल्या मृत्यूची बातमी होती. ती पाहून गोविंद एकदम तोल जाऊन खुर्चीवर बसला. त्याला खूप मोठा धक्का बसला होता. डोळ्यातले पाणी तो कसे बसे आवरत असतांना, अरविंद ने त्याला दिलासा द्यायचा प्रयत्न केला. गोविंद कळवळून म्हणाला " मित्रा हे काय झालं रे... देव चिन्मय च्या आयुष्याला घेऊन असा चिंगूस कसा काय वागला.आमच्या मैत्रीच्या तंबूतला एक बांबू पडला रे. मला जावं लागेल. तू येतोस का माझ्यासोबत? " अरविंद म्हणाला " मी एक दोन दिवसांनी येतो, सध्या त्यांना तुझी जास्त गरज आहे. स्वतःला सांभाळ"

अरविंद घरी येतो आणि जेवतांना अप्पा आणि त्याचा चिन्मयला घेऊन विषय निघतो. अप्पा म्हणतात " मी तुला आधीच म्हटलं होतं. नेत्यांचा सहवास हा...काळ बनू शकतो. वर वर सगळं छान वाटतं पण त्या प्रकाशाखाली किती खोलवर अंधार आहे ते कोणालाच माहित नसतं." अरविंद म्हणतो, " अप्पा सगळे सारखे नसतात. गोविंद चांगलं काम करत आहे आणि मला आजवर काहीच वावगं

दिसलं नाही तिथे." अप्पा रागावून म्हणाले " अरे पण तो तिथे पोहोचलास कसा? एक वाक्य तरी धड बोलता येत का त्याला? कसा काय सांभाळतो हे सगळं त्याचं त्यालाच माहित." त्यावर अरविंद म्हणाला " अहो तो अशिक्षित असला तरी त्याने चांगले लोक जमा केले आहेत काम करायला आणि तसही, बांधकामाच्या व्यवसायात मराठी भाषा बऱ्यापैकी आली तरी बरीच कामं होतात." अप्पा म्हणाले " हो का, बरं. तुझा interview कोणी घेतला होता? " अरविंद म्हणाला " कोणीतरी शिर्के म्हणून होते." अप्पा हसून म्हणाले " अरे ते अभिनंदन शिर्के असतील, सरनाईकांचे प्रिंसिपल सेक्रेटरी. IAS ऑफिसर. आता मला कळतंय कि हे सगळं कसं सुरु आहे ते. शेवटी काय पैसे देऊन हुशार माणसं मिळतातच. आता तुला नाही का त्यांनी घेतलं. " अरविंद म्हणाला "प्रकाशाखालचा अंधार दुसऱ्या एखाद्या दिव्याने दूर होईल हो अप्पा. सध्या मला जे दिसतंय ते सगळं प्रकाशित आहे. चिन्मयचं असं का झालं तेही लवकरच उघडकीस येईल.तुम्ही माझी चिंता करू नका. मी माझं काम खूप प्रामाणिकपणे आणि कोणालाही नुकसान होणार नाही असंच करीत आहे."

माई दोघांकडे पाहून म्हणते " अहो इतरांचे वाभाडे काढता काढता आपल्या आरू ला का वेड्यात काढत आहात. मला पूर्ण विश्वास आहे. आपल्याला हे असे भयानक धक्के कधी बसणार नाहीत. आरू तू जेव आणि आराम कर. ह्यांना घरात बसून येतो कंटाळा आणि मग असेच प्रत्येक विषय घेऊन चिडचिड करत असतात." अरविंद हसून म्हणतो " अप्पा तुम्हाला लावून घेऊ का Dreams मधे? गुंतून रहाल." " नको रे बाबा, त्या ऐवजी एक छान सून घेऊन ये मग मला दोन डोकी मिळतील गप्पा मारायला आणि माझा चांगला वेळ जाईल हसत खेळत" अप्पा हसून म्हणाले.

*एक म्हणतो " साहेब बातमी पहिली ना. हे कसं आणि का झालं त्याचा तपास करू का मी?" दोन म्हणतो " तो करतील रे पोलीस. तू बघ त्याचे कोणासोबत उठणे बसणे होते ते. आपल्या कामाचं काही असेल तर पाहू नाहीतर जाऊ देत" एक म्हणतो " सूर्य ज्या गावातला त्याच गावातले अजून २-३ जण एकत्र काम करतात साहेब. मला एकदा चिंगूस आणि त्यातला एक जण एकत्र दिसले होते. मी तुम्हाला १-२ दिवसात सांगतो ह्यांचे काही समीकरण आहे का ते. मला असं वाटतंय की पैसे जमिनींच्या किव्वा घरांच्या खरेदी विक्री साठी वापरले जात असतील. हे सगळे शांत व्यवहार करणारे आहेत. 3D मी चेक केले. ड्रग, दारू आणि दलाली ह्यात ह्यांचे काही हात पाय असतील असं वाटत नाही." दोन म्हणतो " मला माहित आहे घरांच्या खरेदीत नक्कीच ह्यांचा हात आहे. मी माझी माणसं लावली आहेत तपासाला. पैसे कुठून आणि कसे येतात ते जरा पाहायला हवं. मला वाटतं दुसरी पायरी गवसली कि समजेल किती खोल आहे प्रकरण ते. तू गावाकडून अजून माहिती आण " एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 3. The Sunshine

अप्पा बोलून तर गेले पण अरविंद च्या आयुष्यात असं कोणी नव्हतं जिच्याशी तो आयुष्यभराचं नातं जोडू शकेल.

प्रोजेक्ट्सचं काम जोरात सुरु होतं. एखादं काम कितीही चांगलं असलं तरी त्याची जाहिरात चांगली नसेल तर ते लोकांपर्यंत पोहोचत नाही. अरविंद ने जाहिरात कशी असावी ह्याचा एक नमुना तयार करून बॉस ला पाठवला होता. बॉस म्हणाला "विचार चांगला आहे पण हे अजून छान होऊ शकतं. चहा छान झालाय पण त्यात मसाला असता तर अजून लज्जत वाढली असती" ते दोघे बोलत असतांना अचानक एक आवाज आला " सर तुम्ही एका स्त्रीच्या भूमिकेने प्रोजेक्ट कडे पहा, जसं कि पुरुषाच्या आयुष्यात स्त्री सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणांची उब घेऊन येते. ह्या प्रोजेक्ट ला आपण असं दर्शविलं तर?" दोघेही खुश होऊन पाहू लागले हि मस्त कल्पना घेऊन कोण आलय ते. ती म्हणाली " मी सुकन्या, आजच मार्केटिंग मधे जॉईन झालेय. मला अरविंद सरांच्या प्रोजेक्ट्स मधे काम करायला सांगितलं आहे." अरविंद तिचं स्वागत करत म्हणाला "वेलकम मिस Sunshine. I mean मिस सुकन्या. नावाप्रमाणे तुमची कल्पना पण सुरेख आहे. बॉस... कशी वाटली? " बॉस अरविंद कडे पाहून म्हणाले " तुझ्या प्रोजेक्ट्स सारखी साजेशी आहे.....कल्पना. वेलकम मिस सुकन्या"

सुकन्या ने दिलेल्या कल्पनेला बॅनर्स आणि जाहिरातीचं रूपांतर देण्यात आलं. अरविंद फारच खुश होता सुकन्याची हुशारी, हजरजबाबीपणा आणि तिचा एकंदर वावर पाहून. काही दिवस एकत्र काम केल्यावर त्याच्या मनात तिच्याबद्दल थोडी आपुलकी निर्माण झाली. "सर आपण आज कुठल्या प्रोजेक्ट वर काम करणार आहोत?" तिने विचारलं. अरविंद म्हणाला " अहो तुम्ही मला सर नाही म्हटलं तरी चालेल. अरविंद म्हणालात तर मला बरं वाटेल" सुकन्या किंचित हसून म्हणाली " आणि मला पण तुम्ही फक्त सुकन्या म्हणालात, अहो जाहो ऐवजी, तर मला खूप छान वाटेल" अरविंद म्हणाला "ठीक आहे. चला मग आज लंच सोबत करूया. म्हणजे चालेल ना तुला? " सुकन्या हसून म्हणाली " नक्की. पण आपण मी आणलेले जेवण एकत्र घेऊया का?. मला बाहेरचं जेवण इतकं नाही आवडत " अरविंद म्हणाला " अहो...I mean अगं...आपल्या दोघांना पुरेल इतकं आणलं आहेस का तू?" सुकन्या म्हणाली " मला हे तुला सांगायचं होतं कि आज मी दोघांसाठीही जेवण आणलाय आणि आपण एकत्र जेऊया म्हणून मी इथे आले आणि तुला हे कसा विचारावं ह्याचा विचार करताच होते तितक्यात तू स्वतःहूनच सगळी फॉर्मॅलिटी बाजूला सारून माझं काम सोप्पं केलस." अरविंदला कसं उत्तर द्यावं तेच कळेना. तो मनातल्या मनात विचार करू लागला... 'हे इतक्या सहजपणे कसं काय झालं. मी माझ्या वागण्यातून काही इशारे तर दिले नाहीत ना कळत नकळत'..सुकन्या म्हणाली " इतका विचार नको करुस. जेवण चांगलं बनवते मी" त्यावर दोघेही हसून जेवायला निघाले. ते बाहेर जाणार इतक्यात गोविंदराव समोरून आले. त्यांनी सुकन्याला विचारले " कशी आहेस. काम कसं सुरु आहे. अरविंद सोबत काम जमतंय का" त्यावर अरविंद लगेच म्हणाला " अहो गोविंदराव माझं

जाहिरातीचं काम अगदी सोपं आणि सुंदर केलय ह्या मॅडमनि. नावाप्रमाणेच आहेत ह्या " गोविंदराव मिश्किलपणे म्हणाले "अरे हो..प्रश्न तिला विचारला आणि उत्तर तू देतो आहेस." अरविंद त्यावर एकदम लाजल्यासारखं हसला. गोविंदराव म्हणाले " ह्या विषयावर आपण सविस्तर बोलुयातच अरविंद. कुठे निघालात?" त्यावर सुकन्या लगेचच म्हणाली " जेवून येतोच आम्ही पटकन" गोविंदराव त्यांचे ते समीकरण पाहून हसून म्हणाले "एकत्र काम आणि जेवण करताय. बरं बरं. चालू द्या. भेटूया आपण थोड्या वेळाने" त्यांना एकत्र जातांना पाहून गोविंच्या चेहेऱ्यावर समाधान होतं. त्याने लगेच सुकन्याच्या बॉस ला फोन लावला आणि सुकन्याला अरविंदच्या प्रोजेक्टमधे full time नेमणूक करायला सांगितलं. अरविंदच्या ऑफिसच्या बाजूलाच एक छोटंसं ऑफिस देखील बनवायला सांगितलं.

दुसऱ्या दिवशी हा बदल पाहून अरविंद मोहरून गेला. गोविंद त्याच्या ऑफिस मधे येताच त्याचा प्रसन्न चेहेरा पाहून गोविंद म्हणाला " मनासारखं झालेलं दिसतंय. स्वारी आज खुश दिसतेय." अरविंद म्हणाला " हे सगळं का केलस? मला काम करायला आवडतं तिच्याबरोबर इतकंच." गोविंद म्हणाला " आणि एकत्र जेवण करायला पण ना. अरे कर कि काम आता सोबतच. तू खुश असलास कि अजून छान काम करशील. त्यात माझाच फायदा आहे कि." अरविंद म्हणाला " Thank You मित्रा. आता अजून जोमाने काम करेन मी." गोविंद म्हणाला " अजिबात संकोच न करता मला सांग काही हवं असेल तर. तुझ्या चांगल्या कामामुळे मला आता अजून मोठी स्वप्नं बघता येतील. "

सुकन्या ते दोघे बोलत असतांना ऑफिस मधे आली आणि TV लावून म्हणाली " हे पाहिलत का? हेमंतराव आणि प्रकाशरावांना house arrest केलंय.

एका घटनेमुळे आता किती लोकांना त्रास होणार आहे कोण जाणे. मैत्रीची अशी शिक्षा का बरं मिळावी. तुम्हाला काय वाटतं साहेब " अरविंद सुकन्याच्या अश्या बोलण्यावर आश्च्यर्य व्यक्त करीत म्हणाला " मी गोविंदला आणि ह्या तिघांना सरनाईक साहेबांसाठी एकत्र काम करतांना पाहिलं आहे. होऊ शकतं कि ह्या दोघांना अश्या काही गोष्टी माहित असतील ज्यामुळे चिंगूस...म्हणजे चिन्मयला ज्यांनी मारले त्यांना पकडता येईल. गोविंद तुझा ह्यात काही सहभाग नाहीना?" गोविंदाच्या चेहेर्यावरचे चिंतेचे भाव स्पष्ट दिसत होते. गोविंद म्हणाला " सुक्याबरोबर ओळही जळतं म्हणतात हे खरंच आहे. आता हे लोक माझ्या मागे लागायला मागेपुढे पाहणार नाहीत. जे होईल ते पाहिलं जाईल. आपल्यावर जोवर साहेबांचा हात आहे तोवर काही चिंता नाही. अरविंद तू जर आमच्या सोबत राहिला असतास तर तुलाहि सगळं वैभव मिळालं असतं." त्यावर सुकन्या म्हणाली " अजूनही मिळू शकतं कि, हुशार आहे हा." त्यावर अरविंद हसून म्हणाला " झाडाची मुळे नाही तर त्याचं खोड आणि फांद्या ठरवतात कोणती आणि कशी फळे आणि फुले लागतात ते. आता आम्ही सगळे एकाच गावातले पण सरनाईकां सारख्या माळ्याने ह्या चार जणांची कलमे करून त्यांना हापूस आंबे बनवले आणि मी जसा होतो तसाच राहिलो शेवगांच्या शेंगासारखा. मी फक्त प्रोजेक्ट्स डिलिव्हर करणार" गोविंद म्हणाला " तू हुशार आहेस, तू खूप पुढे जाशील. आम्ही कितीही प्रगती केली तरीही आमचे पाय खेचायला आहेतच शासन आणि पोलीस यंत्रणा"

*एक म्हणतो " साहेब मी बातमी पहिली." दोन म्हणतो " तुझी माहिती खूप कामात आली. मला वाटतंय कि आपण*

*जवळपास दुसरी पायरी संपूर्ण आपल्या ताब्यात घेतली आहे." एक म्हणतो" तुम्हाला मी काही फोटो पाठवतो. उगमाचं स्थान सापडलंय मला. एक सोडून दहा आहेत. रोख पैसे इकडून तिकडे हलवले जात आहेत. अनेक जण आहेत सामील ह्यात. मला वाटतं ह्याची बातमी छापून टाकली तर?" दोन म्हणतो "म्हणजे भूकंप करायचा आणि सगळ्यांना सळो कि पळो करायचं. पण त्याने काहीजण सावध झाले तर." एक म्हणतो " सावध होऊन काहीतरी लपवायचा प्रयत्न करतील आणि आपल्या हातात काहीतरी लागेल कदाचित. होऊ शकतं काही दिवस शांत बसतील. त्यानेही आपल्याला माहिती मिळेल कि कोण कोण शांत झाले आहेत, त्यांची नावं जोडायची मंडळात" दोन म्हणतो " हुशार आहेस तू. तयार राहा. धमाका झाला कि चौफेर लक्ष ठेव" एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 4. The Sale of Seats

अरविंद TV लावून त्याच्या ऑफिस मधे काम करत असतांना, एक breaking news येते. चिन्मय लेले ह्यांच्या हत्याप्रकरणात अनेक मोठी नावं समोर येत असून, आता उपमुख्यमंत्री श्री संकेत सरनाईक ह्यांचा दिवंगत लेले ह्यांच्याशी थेट संबंध असल्याचं समोर येत आहे. ते ऐकून अरविंद बातमी लक्ष्य देऊन ऐकू लागतो. बातमी पाहत असतांना एका बाजूला वृत्तपत्र घेऊन त्यातले Sale of Seats (SOS) हे सदर तो वाचू लागतो. सुकन्या तेवढ्यात त्याच्या ऑफिस मधे येऊन Good Morning म्हणते. त्यावर अरविंद म्हणतो " कसली Goog Morning ? काय सुरु आहे ते पहा. हे बघ इथे काय लिहिलंय : जिथे जिथे म्हणून जागेच्या नेमणुकीची स्पर्धा असते तिथे तिथे काळाबाजार सुरु आहे. अगदी पहिल्या इयत्तेपासून ते महाविद्यालयातील जागा भरणी असो, सगळ्या प्रकारच्या गुणवत्ता परीक्षा असोत किव्वा शिक्षकांची नेमणूक असो, शासनात जागांची नेमणूक असो किव्वा कोणत्याही चांगल्या स्थळी बदली असोत, पैसे सर्रास दिले आणि स्वीकारले जातात. हे सगळे पैसे नंतर Real Estate, Entertainment, Drugs अश्या कोणत्या ना कोणत्या यंत्रणेत गुंतवले जातात. पैसे काळ्याचे पांढरे करण्याचे एक साधन म्हणून Real Estate हे एक चांगले उदाहरण म्हणता येईल. पैसे रोख देऊन घर विकत घ्यायचे. दोन तीन वर्ष थांबून ते घर मग पुन्हा विकायचे आणि थोडाफार कर भरून ते पैसे बाजारात परत आणायचे. हा प्रकार छोट्यांपासून ते मोठ्या Real Estate Companies मधे अगदी रोज आढळून येतो. अगदी त्यांच्या चांगल्या

कामासाठी प्रसिद्ध असलेली, Dreams Company पण ह्याला अपवाद नाही. सुकन्याकडे पाहून पेपर जोरात खाली ठेऊन तो म्हणाला " हे असं कसं लिहू शकतात. किती मेहेनतीने मी अगदी आपल्या स्वतःच्या मुलांसारखं हे प्रोजेक्ट्स वाढवतो, पूर्ण करतो. किती कौतुक करतात लोक आपलं पर्यावरणाचा मान ठेवत उभारलेले अतिशय उत्तम बांधकाम आणि विकतोही वाजवी दरात. परंतु ह्यांच्या ह्या एका वक्तव्याने सगळं पाण्यात गेलं असं वाटतं. मला ह्या अरुंधतीला भेटायचंय आणि विचारायचं कि तिला काय असं दिसलं ज्यानी हि अशी बातमी छापून आणावीशी वाटली." सुकन्या म्हणाली " अरविंद अरे जाऊ दे. नको इतका विचार करुस. मनात शंका नको घेऊस. मला नक्की माहित आहे इथे काहीच वावगं होत नाहीये ते. हे असं लिहून लोकांची दिशाभूल करतात हे पत्रकार. बातम्या विकत घेऊन कोणासाठी आणि का अश्या छापतात ते कधीच कोणाला समजत नाही. आपली अनेक जणांशी स्पर्धा सुरु आहे. असू शकतं कि हिने पैसे खाऊन कोणाच्यातरी म्हणण्यावरून आपलं नाव नमूद केलं असेल" अरविंद म्हणाला " हेच तर मला तिला विचारायचं आहे. कुठून कळलं कि आम्ही काळाबाजार करतो ते. भेटून विचारतोच तिला." सुकन्या म्हणाली " अरे उगाच वाद होईल आणि अजून काहीतरी छापले जाईल उद्या. कानाडोळा कर." त्यावर अरविंद अजून जोमाने म्हणाला "नाही... माझ्या प्रामाणिकपणाला मी हे असे गालबोट लावू देणार नाही. मला पूर्ण हक्क आहे जाणून घ्यायचा कि ह्यामागे काय राजकारण आहे ते. इकडे चिंगूस चा खून होतो आणि त्यात हि अशी बातमी मला काही स्वस्थ बसू देत नाहीये. " सुकन्या म्हणाली " बरं. मी तिला भेटायला बोलवते, आपण दोघेही जाऊ. तू मात्र डोक्यात राख घालून घेऊ

नकोस आणि शंका तर अजिबात घेऊ नकोस." अरविंद नाराजीने म्हणाला " ठीक आहे. भेटूया आपण दोघेही"

अरुंधती समोरून येता येता एकटक अरविंदकडे पहात होती. सुकन्याला ते पाहून जरा आच्छर्य वाटले. अरुंधतीने अरविंदकडे हात पुढे करून हस्तांदोलन केलं. तिच्या चेहेऱ्यावरचे भाव आणि हसू सुकन्यानी पहिले. अरविंद मात्र नाराजी दाखवत विचारू लागला "तुम्हाला आपण का भेटत आहोत ह्याचे कारण ठाऊक असेलच. असं काय पाहिलंत तुम्ही ज्यामुळे तुम्हाला असं वाटलं कि Dreams मधे काळाबाजार होतो. " त्यावर अरुंधती म्हणाली " अरविंद आपण साधारण एकाच वयाचे आहोत. मला तू म्हटलंस तरी चालेल. तुझाबद्दल मी खूप छान गोष्टी ऐकल्या आहेत आणि जे लिहिले त्यातले एकही वाक्य तुला लागू होत नाही. Please Dont Take Anything Personally.आता राहिलं जे मी लिहिले त्याबद्दल, तर तुला माहित आहे का कि तुमच्या प्रोजेक्ट्स मधे ६५ टक्के लोक, इमारत उभी होत असताना, रोख रक्कम देऊन घर घेतात आणि त्यासाठी तुम्ही त्यांना किंमत कमी देखील करून देता. निव्वळ घरांची संख्या मोजली आणि त्यानुसार तुमच्या एकंदरीत उत्पन्नाचा अंदाज लावला तर त्यामानाने तुम्ही शासकीय कर खूप कमी भरता. ह्याचा अर्थ हाच होतो कि, रोख रक्कम तुम्ही घेऊन ती सगळीच बँकेत जमा करत नाही. इमारत पूर्ण उभी होऊन सोसायटी ला द्यायच्या आधी तुमची ५० टक्के घर resale मधे विकली जातात. तेव्हा NOC देतांना तुम्ही जे पेसे घेता ते आणि ३५ टक्के जी घरं तुम्ही चेक किव्वा बँक demand draft द्वारे विकली गेली आहेत ती रक्कम तुम्ही दाखवता आणि फक्त त्यावर तुम्ही कर भरता." सुकन्या हे सगळं ऐकता ऐकता विचार करू लागली : हे सगळं हिला कसं माहित? कोणी सांगिलंत असेल? इतकी

माहिती बाहेर राहून तर मिळणार नाही. तिला विचार करतांना पाहून अरुंधती थांबली आणि जरा मोठ्या आवाजात म्हणाली " सुकन्या तुम्ही ऐकताय ना मी काय म्हणत आहे ते. मला इथे तुम्ही बोलावून घेतलं आहे तेव्हा मी काय सांगतेय ते लक्ष्य देऊन एका " त्यावर सुकन्या लगेच म्हणाली "समजा आपण असं म्हटलं कि तुम्ही जे म्हणताय ते सगळं खरं आहे, तर काही पुरावा आहे का तुमच्याकडे हे सगळं सिद्ध करायला. " अरुंधती म्हणाली " मी निर्भीड आणि हाडाची पत्रकार आहे. मी जे लिहिते ती काही कादंबरी म्हणून नाही तर सगळं नीट समजून घेऊन आणि शहानिशा करून लिहिलेले सत्य आहे. सत्य हे कधी कधी कल्पनेपेक्षाही अद्भुत असतं. मला अंदाज लावून कल्पना लिहिलेलं जमत नाही. माझी शिकवण मला तसं करायची संमती देत नाही. बरं हे सगळं वाचून तुमचे भाऊ Mr रावले काय म्हणाले. कसे आहेत ते? " हे ऐकून अरविंद चकित झाला आणि त्याने सुकन्या कडे एक कटाक्ष टाकला.  अरुंधती अरविंद ला म्हणाली " हे बघ अरविंद. तुला वाईट वाटून घ्यायचं काहीच कारण नाही. तू तुझी कामं किती चोख आणि पारदर्शीपणे करतो ह्याचाही पुरावा आहे माझ्याकडे. परंतु तुमच्या कंपनी मधे अनेक जण काम करतात. तुझ्या एकट्याच्या चांगल्या कामामुळे इतरांचं वाईट काम झाकलं जाऊ शकत नाही." त्याच्या हातावर हात ठेऊन अरुंधती म्हणाली " तू तुझं काम चांगले करत रहा. Dont Worry " सुकन्या ते पाहून म्हणाली " तुम्हाला भेटून बरं वाटलं. आम्हाला आता निघायला हवं" असं म्हणत ती उठून उभी झाली. अरविंद तिच्याकडे पाहून उठणार तितक्यात अरुंधती म्हणाली " तुम्हाला अजून काही शंका असतील तर आपण परत भेटू शकतो. I would Love to Meet Again " सुकन्या त्यावर म्हणाली " तुम्ही परत काही लिहिलंत तर कदाचित परत भेट होईलच. ह्यावेळी मानहानी केल्याबद्दल

काही कारवाई होणार नाही परंतु भविष्यात काय होईल ते मी नाही सांगू शकत." अरुंधती शांतपणे म्हणाली " तुमचे वकील तुम्हाला तूर्तास शांत बसून राहा असाच सल्ला देतील ह्याची खात्री आहे मला."

खूप मोठा अपमान झाल्यासारखी चिडली होती सुकन्या. अरविंद देखील नाराज होता. त्याने तिला विचारलं " गोविंद तुझा भाऊ आहे हे मला कसं माहित नाही. का नाही सांगितलंस?" सुकन्या म्हणाली " मी आणि साहेब शनिवारच्या launch पार्टी मधे ड्रिंक्स घेत गप्पा मारत असतांना हि होती तिथे. साहेबांनी उगाचच तिला संशय नको म्हणून माझी चुलत बहीण म्हणून ओळख करून दिली. ते जाऊदे ती तुझ्याकडे असं का बरं पहात होती. काय ते प्रेम सांडत होतं डोळ्यातून आणि तुझं किती कौतुक करत होती " ते ऐकून अरविंद हसून म्हणाला " तिचं जाऊदे पण तुला मिरची का झोंबली? " त्यावर सुकन्या म्हणाली " गोड बोलून माहिती काढून घेणारी असेल ती पत्रकार. तू काही भेटू नकोस तिला. उगीचच गेलो तिला भेटायला असं वाटतंय." अरविंद म्हणाला "बराच अभ्यास करून आलेली दिसत होती. मी जरा accounts पाहून घेतो एकदा. कुठे काही गडबड दिसतेय का ते. " सुकन्या पटकन म्हणाली " अरविंद तू तसाही खूप व्यस्त असतोस. ती जे म्हणाली त्यावरून काम वाढवून घेऊ नकोस. साहेब बघून घेतील काय ते. चल आपण जेवण करून कामाला लागूया. चार दिवसात Launch आहे. मला होर्डिंग पाहायचे आहेत परत एकदा." अरविंद म्हणाला " हो आपण आपलं काम करत राहुयात. आपल्याकडून गोविंदला काही त्रास नको." एकीकडे अरविंद मनात विचार करू लागला : गण्या आणि इतर हे असेच पैसे देऊन पास झालेत आणि महाविद्यालयात गेलेत ते तर मला त्यानेच सांगितलं. गिर्हाईकांकडून रोख रक्कम घेऊन ती कुठे जाते त्याबद्दल विचारलं

पाहिजे. माझे सगळे व्यवहार तर चेकनेच होतात. त्यामुळे त्यातलं सगळं मला दाखवता येईल, उद्या जर काही प्रश्न उभे झाले तर. अरुंधती प्रमाणे माझेही शिक्षण मला cash मधे गैरव्यवहार करण्याची संमती देत नाही.

*एक म्हणतो "साहेब बातमीने वावटळ सुरु झालाय. तुमचा चंद्र आणि त्याची चांदणी सापडली मला. फोटो पाठवलाय. " दोन म्हणतो " चंद्र मला ठाऊक होता हि चांदणी आहे का. आता ह्या दोघांवर अगदी डोळ्यात तेल घालून लक्ष ठेव. कदाचित मोठा घबाड हाती लागू शकतं. " एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 5. The Solar System

सरपोतदार साहेब, पन्नाशीत असूनही तसे न वाटणारे. तीक्ष्ण नजर आणि गंभीर धारदार चेहेरा. साधे सुधे गुन्हेगार नुसतं पाहूनच गार पडतील अशी रुबाबदार व्यक्ती. ED मधे तसे तर आकड्यांशी खेळणारे आणि डोळयाला जाड भिंगाचा चष्मा लावलेले असे अधिकारी असतात. सरपोतदार आल्यापासून मात्र त्यांनी तरुण, हुशार आणि चतुर मुलं मुली भरती करून ATS सारखे हे डिपार्टमेंट चालवले होते. थोडी माहिती मिळाली कि लगेच सैनिक तैनात करून एखाद्या यंत्रणेत आतपर्यंत जाऊन तिला मुळासकट उपटून काढायचे हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. गुन्हेगारांना बाहेरून पाहिल्यापेक्षा त्यांना आतवर जाणून घेऊन त्यांची पूर्ण संघटना हादरून टाकायची आणि त्यांचा प्रमुख पळून जाण्याआधीच त्याला कोठडीत टाकायचे असे धोरण ठेऊन ते वागत असत. प्रत्येक गुन्हेगार यंत्रणेला ते Solar System म्हणत आणि मग त्या यंत्रणेच्या सूर्य चंद्र शनी अश्या सगळयांना आपल्या ED मधला एक एक ग्रह जोडून त्या सूर्याला ग्रहण लावायचं आणि गुन्हा घडतांना त्याला रंगे हाथ पकडायचं अशी रचना ते बांधत असत. त्यांच्या खुर्चीमागे आता उपमुख्यमंत्रींची Solar System होती एका मोठ्या फलकावर. सगळयात वर सूर्य म्हणून सरनाईक ह्यांचा फोटो तर एक एक क्रमाने त्यांचा साठी काम करणारे सगळे ग्रह आणि त्यांचे फोटो आणि त्यांची नावं लिहिली होती. चिन्मयच्या फोटोवर फुली होती म्हणजे तो आता हयात नाही. दोन नावांमध्ये कसल्या प्रकारचे नाते आहे ते बँक अकाउंट्स किव्वा फोन नंबर्स अशी माहिती लिहून नमूद केले होते. काही

ठिकाणी किती वेळा आणि किती वेळ भेट होते ते लिहिले होते. एका बाजूला काही तारखा नमूद केल्या होत्या. आणि काही ठिकाणी केवळ नावं होती. ह्याचा अर्थ म्हणजे त्यांचे फोटो किंवा ठावठिकाणा अजून माहित नाही. सरपोतदार रोज सकाळी ऑफिस मधे आले कि ३० ते ४० मिनटे त्या फलकाकडे पाहून विचार करून आपला दिवस सुरु करायचे.

अरुंधतीला येतांना पाहून ते उठून उभे झाले आणि म्हणाले "उंदरांना बोटीतले पाणी आता वाढत चाललंय हा संदेश मिळालेला दिसतोय. आता बघ कशी पळापळ होईल आणि आपल्या हातात बरंच काही लागू शकेल. खूप छान होता लेख. अभिनंदन" त्यावर अरुंधती म्हणाली " अहो काय साहेब! माझं कसलं अभिनंदन. हे म्हणजे असा झालं कि, बुध्धीबळाची चाल तुम्ही चालायची आणि आम्ही त्या जागी उभे आहोत म्हणून कौतुक करायचं." सरपोतदार म्हणाले " खेळात प्याद्यांमध्ये जीव नसतो अरुंधती. इथे जिवंत माणसांसमोर उभं राहायला पण हिम्मत लागते. आणि त्यात तू नुसती उभी राहिली नाहीस तर मस्त भेटून दमदार उत्तर देऊन आलीस. आता बघ त्यांचा वजीर कसा हलतो ते... राजाला वाचवायला." अरुंधती अभिमानाने म्हणाली " संताप आणि धांदल ह्यांचं एक सुरेख मिलन दिसलं त्यांच्या हावभावात मला. त्यात मी थोडा खट्याळपणा टाकून अजून डिवचलं त्या सुकन्याला." साहेब म्हणाले " तू आहेसच हुशार. बरं..आता जरा चौफेर लक्ष देऊन रहा आणि थोडी सावधही. तुला काही धोका वाटला तर तुला माहित आहेच कोणाला सांगायचं ते. आता खालच्या दोन प्याद्यांच्या रांगा पूर्णपणे नष्ट करायची वेळ आली आहे. वरती मग धांदल वाढेल आणि आपल्याला बऱ्याच संधी मिळतील ग्रहण घडवून आणायला." ह्यावर अरुंधती म्हणाली " साहेब तुम्हाला

एखादं सूर्यमंडळ अगदी छान चालवता येईल." साहेब हसून म्हणाले " माझं मंडळ तुम्हीच आहेत. एका सूर्यमंडळाला दुसरं सूर्यमंडळच पूर्णपणे नष्ट करू शकतं. आपण शस्त्र न बाळगता तेवढ्याच जोमाने बळी घेऊ शकतो. साप विळखा घालतो तसं आधी अवयवांचं बळ कमी करायचं आणि मग मोठ्या तोंडाने मेंदू असलेल्या डोक्याचा घास घ्यायचा. एकही उंदीर सुटला कि तो बाकीच्यांना सावध करतो नाहीतर स्वतः राजा बनतो आणि मग आपल्याला सगळं पुन्हा सुरु करावं लागत नव्याने. नवे डाव. नव्या युक्त्या."

गोविंद अरविंदच्या ऑफिस मधे येतो आणि रागाने येरझारा घालत म्हणतो " किती वेळा ह्यांना दाखवून द्यायचं कि आपण नैसर्गिक पांढरे आहोत. काहीच गालबोट नाही. परत एकदा बाहेरच्या ऑडिट टीम ला आणून सगळं परत एकदा तपासून घायला सांगतो." अरविंद म्हणाला " मित्रा नको काळजी करुस. माझे सगळे व्यवहार नीट आहेत. मी कोणालाही सामोरं जाऊ शकतो." गोविंद म्हणतो " अरे पण इतर बरेच आहेत ना इथे काम करणारे. मला कोणतीही शंका नकोय मनात. आज ते लोक आले कि...जे म्हणतील ते त्यांना दे आणि सुकन्या जरा माझ्याबरोबर असेल आज मदत करायला. सगळी कागतपत्र आणि online व्यवहार नीट डोळ्याखालून घालावे लागतील." अरविंद म्हणाला " तू कर जे तुला ठीक वाटेल ते. माझ्याकडून सगळी मदतच होईल. सुकन्याची सगळी कामं मी पुढच्या आठवड्यावर लांबवतो. तू शांत रहा आणि स्वतःची काळजी घे" ते ऐकून, गोविंद तिथून लगबगीने निघून जातो.

दुपारपासून १० १२ लोकांची टोळी सुटाबुटात येऊन बोर्डरूम मधे बसते. हळू हळू मोठे मोठे कागदांचे गठ्ठे त्या रूम मधे जाऊ लागतात. सुकन्या आणि

गोविंदराव त्यांना जी काही मदत करू शकतील ती करतांना दिसतात. अरविंद विचार करतो "गोविंद सगळं करतोय... जे एक चांगला नायक करू शकतो आपलं राज्य वाचवायला. बरं झालं मी Dreams मधे आलो. हे सगळं पाहायला मिळत आहे आणि बरंच शिकायला देखील मिळत आहे. " संध्याकाळी उशिरापर्यंत ऑडिटच काम सुरु होतं. अरविंद देखील ऑफिस मधे बसून जशी जमेल तशी मदत करत होता. त्याने पाहिलं कि दोन प्रकारचे गठ्ठे बनत होते. त्यातले काही रोकॉर्ड्स रूम मधे जात होते आणि बाकीचे खाली उभ्या असलेल्या एका गाडीत ठेवले जात होते. अरविंद निघाला तेव्हा ती गाडी निघत होती. अरविंद त्या गाडीच्या मागे जात राहिला आणि त्याने पाहिलं कि ती गाडी highway सोडून एका गावाकडे जाऊ लागली. तो पुढे त्याच्या घराकडे निघून गेला.

सरपोतदार काही फोटोंना फुल्या करत होते. आता त्या फलकावर पाच जण आणि चिन्मय ह्यांच्या फोटोवर फुल्या होत्या आणि ते समाधानाने त्या पूर्ण फलकाकडे पहात होते.

*एक म्हणतो " साहेब घबाड आहे कि पालापाचोळा" दोन म्हणतो " तुझे खूप खूप आभार. हे नक्कीच घबाड आहे. एक एक गोष्ट शुद्ध सोनं. त्या बातमीने तिचं काम अचूकपणे केलं. सावध राहायच्या प्रयत्नात ते आपल्या शिकारीतलं सावज बनले. सगळे डाव सध्यातरी आपण नीट खेळतोय. आता फक्त ह्यातून जे मिळेल त्याचा वापर करून ह्या सगळ्या चंद्र ताऱ्यांना सूर्यासकट एकाच वेळी कसा गिळता येईल ते पाहावं लागेल" एक म्हणतो " साहेब*

*तुम्ही मला टिकणं आणि साधारण कसे व्यवहार आहेत ते सांगा मी पूर्ण माहिती काढून तुम्हाला देतो. तुम्ही मग तुमचा जाळं टाका. ते पाच जण आपापसात भांडण करून गेले अशी बातमी मी पसरवली आहे. त्यांना का अडवलं ते कारण मात्र तुम्ही नीट चौकटीत बसवा. उगीचच पोलीस मागे लागले तर आपल्याला त्रास होईल." दोन म्हणतो " ते मी सांभाळून घेतो. तुला काही फोटो पाठवतो. तू माहिती काढ. एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 6. The Sun

संकेत लहानाचा मोठा होत असतांनाच त्याने इतरांना आपल्या कामातून संकेत दिला होता कि हा मोठा बनून नेता होणार. क्रिकेट मधे captain बनणे, गणपती उत्सवात सगळ्यात पुढे होऊन काम करणे. जत्रा, मेळावे आणि सार्वजनिक कार्यक्रमात नेहेमीच पुढे होऊन धडाडीने कामं करणारा संकेत कधी महाविद्यालय निवडणूक, ग्रामपंचायत निवडणूक करत करत आता उपमुख्यमंत्री पदावर जाऊन पोहोचला ते कळलेच नाही. आयुष्यात एकही लढलेली निवडणूक न हरणारा तो पक्षात एकमेव नेता होता. त्याच्या गावात त्याला जितका मान होता तितकाच तो जिथे जिथे जाई तिथे तिथे त्याला मिळत असे. लोकांशी आपुलकीने बोलणारा, त्यांचे प्रश्न सोडवणारा असा लोकांचा नेता असं म्हणून त्याला संबोधले जाई. मुलाखतीत नेहेमीच तो युवा शक्ती आणि युवक कसे देशाचे भविष्य चांगले साकारू शकतात ह्याबद्दल बोलत असे. युवकांना शिकवलं आणि त्यांना जर योग्य वयात काम मिळालं तर आपला देश लवकर विकसित होईल असे तो आपल्या भाषणात नेहेमी म्हणत असे. एका भाषणात तो आपले विचार मांडत असतांना तो म्हणतो " मित्रहो, आपला देश जर एक तारकामंडळ आहे असं म्हटलं आणि प्रत्येक जिल्हा हे एक सूर्यमंडळ आहे असं मानलं तर माझं असं स्वप्न आहे कि आपल्या राज्यातील प्रत्येक जिल्हा आपण स्वयंभू केला त्या सूर्यमंडळासारखा तर असे असंख्य स्वयंभू सूर्यमंडळ असलेले तारकामंडळ देखील स्वयंभू होईल आणि येणारे हजारो वर्ष नेहेमी चमकत राहील. प्रत्येक जिल्हा शिक्षण, अत्यावश्यक गरजा आणि उद्योगधंदे

ह्याबाबतीत स्वयंभू झाला तर आपले युवक शहरात जाऊन गर्दी करणार नाहीत. प्रगतीचा समतोल राहील आणि केवळ ज्या गोष्टींची अत्यंत गरज आहे त्याच गोष्टींची देवाणघेवाण जिल्हे आपसात करतील. मला हे स्वप्न साकारायला तुम्हा सगळ्यांची साथ हवी आहे आहे. मग देणार ना माझी साथ? " असे म्हणताच सगळे उपस्थित एकसुरात म्हणतात " संकेत साहेब आगे बढो, हम तुम्हारे साथ है!!"

सभा असोत, मुलाखती असोत, संकेत ला नेहेमीच खूप छान प्रतिसाद मिळत असे. त्याच्या मुलाखती घेण्यासाठी TV चॅनेल्स ची चढाओढ होत असे. कारण त्याचा मुलाखतीला सर्वोच्च TRP मिळत असे. अश्या लोकप्रिय नेत्याबद्दल जेव्हा घोटाळ्याची बातमी आली तेव्हा कोणाचा विश्वास बसेना. न्यूस चॅनेल्स नि रेटिंग घसरतील म्हणून ती बातमी लवकरच दाबून टाकली.

हा सगळा प्रकार पाहून सरपोतदार आपल्या साथीदारांना म्हणाले "हा तळपता सूर्य सर्रास लोकांची दिशाभूल करून आपण कसे चंद्रासारखे लोभस आणि आनंद देणारे आहोत असं भासवतोय. ह्याला ग्रहण लावेल असे बरेच पुरावे आपल्याया ह्या खजिन्यात सापडतील." एका कोपऱ्यात ठेवलेल्या गठ्ठ्यांकडे बोट दाखवून ते म्हणाले. ते गठ्ठे Dreams ऑफिस मधून बाहेर पडलेल्या गाडीत होते. "आपण कायदा बनवत नाही किव्वा मोडतही नाही, परंतु कधी कधी योग्य वेळो योग्य आघात करून, कमीतकमी बळी घेऊन जास्तीतजास्त माहिती गोळा करायची संधी हाती लागते तेव्हा आपण पुढे मागेही पहात नाही."

पोलीस ५ मृत शरीरांच्या आजूबाजूचा परिसर शोधून काही पुरावा मिळत आहे का ते पाहतांना दिसतात. इन्स्पेक्टर जमलेल्या मीडिया ला संबोधित करत म्हणतात " सध्या तरी आपसातल्या भांडणातून घडलेला घातपाताचा प्रकार दिसत

आहे. हे पाचही जण इथल्या गावातील रहिवासी असून, शेतात आग लागून त्यातून झालेल्या भांडणामुळे एकमेकांचा जीव घेऊन हा प्रश्न सोडवायचा प्रसंग वाटत आहे. एकमेकांना कोयते आणि चाकूंनी भोसकून मारले गेले आहे असं दिसत आहे. ह्या प्रकरणाची आम्ही चौकशी लवकरच पूर्ण करून अहवाल सादर करू. सध्यातरी कोणतीही तक्रार गावातल्या रहिवाश्यांनी केली नाही. सध्या सगळे गाव ह्या प्रकरणाने सुन्न झाले आहे आणि आम्ही त्यांची ज्या प्रकारे मदत करू शकतो ती करत आहोत. सगळया मृतांची ओळख झाली असून लवकरच त्यांची शवे त्यांच्या कुटुंबियांच्या हवाली केली जातील" सरपोतदार हे TV वर पाहून शिर्के ला म्हणतात " अगदी छान हे सगळे पार पडले. तुझे विशेष आभार. हे पाच स्वतःचे सूर्यमंडळ उभे करण्याआधीच मावळले ते एकंदरीत बरेच झाले. जितक्या वेगाने गुन्हेगार तयार होतात तितक्याच वेगाने प्रशासनात तुझ्यासारखे अनेक शिर्के जन्माला आले असते तर किती बरे झाले असते" त्यावर शिर्के म्हणतात " सध्या गरज तुमच्या सारख्या हजारो सुर्यांची आहे साहेब. तुम्ही जे आणि जसं काम करताय तसं सगळयांनी केलं तर गुन्हेगार लवकरच जमिनीवरच्या नरकात म्हणजे तुरुंगात किव्वा वरच्या नरकात पोहोचतील." ते ऐकत असतांनाच सरपोतदार त्या पाच फुल्या केलेल्या फोटोंच्या आजूबाजूला नजर फिरवत विचार करू लागले.

अरुंधती केबिन मधे येऊन सरपोतदार साहेबांना विचारते " फोन करून बोलावून घेतलंत. काही विशेष. " सरपोतदार म्हणतात "कंपन्या त्यांचे वापरात नसलेले कागद कचरा म्हणून जाळतात आणि त्यामुळे आजूबाजूला किती वायू प्रदूषण होते त्यावर एका छोटासा लेख लिही आणि Dreams च नाव पुन्हा एकदा पुढे येऊ देत. लवकरच अजून एका मोठ्या लेखाची वेळ आली आहे. तुला मी

तपशीलवार सांगेन वेळ आल्यावर. वेळ आहे ना पुढच्या आठवड्यात तुझ्याकडे?" अरुंधती म्हणते " अहो काय हे साहेब. तुमच्यासाठी आणि माझ्याकडे वेळ नाही असं कसं होईल...मजकूर तुम्ही देणार कि इतर कोणी ते फक्त सांगा, मी हजर होईन." सरपोतदार त्या गठ्ठ्यांकडे पहात मिश्किल हसून म्हणाले "ज्याने कुबेराच्या धनाचा पत्ता सांगितला तोच देईल तुला मजकूर. साहेबांच्या ग्रहणाची वेळ जवळ येत आहे. आम्ही आमचा विळखा आवळायला सुरुवात केली आहे. तुझं आता एका हातात लेखणी आणि दुसऱ्या हातात दोर घेऊन मुसक्या बांधणारी असं दुहेरी रूप दाखवायची वेळ आली आहे. तयार रहा" अरुंधती एकदम जोमाने म्हणते " Yes Sir "

गोविंदराव मीडिया ला संबोधित करत म्हणतात " मलाही तुमच्यासारखे अरुंधती मॅडमच्या लेखातूनच कळले कि आमच्या ऑफिस मधून बरेच कागदपत्र highway शेजारी असलेल्या गावात जाऊन जाळण्यात आले. मी ह्याबाबतीत आमच्या रेकॉर्डस् ऑफिसर शी बोललो आहे. मी माझी जाहीर माफी व्यक्त करतो आणि ह्यापुढे पर्यावरणाला त्रास होईल अश्या गोष्टी आम्ही करणार नाही ह्याची पूर्णपणे काळजी घेतली जाईल असे आश्वासन देतो. आमच्या कंपनीला आमचे customers जो प्रतिसाद देत आहेत तो कायमच देत राहावा अशी विनंती देखील करतो. तुम्हा सगळ्यांचे आणि विशेष करून अरुंधती मॅडमचे आभार कि हि बातमी तुम्ही छापून आणून केवळ आमचे नाही तर इतर उद्योजकांचे कान पिळलेत आणि जाब विचारलात." त्यावर एक प्रश्न विचारला गेला " मागे तुमच्या प्रोजेक्ट्स मधे रोख रक्कम घेऊन काळाबाजार केला जातो अशी एक बातमी आली होते त्यावर तुम्ही काय म्हणाल?" गोविंदराव शांतपणे उत्तरले "रोख रक्कम घेऊन आम्ही

आमच्या शेतकरी भावांना घरं देतो कारण त्यांना तसे व्यवहार करणं सोपं जातं. ह्या बाबतीत मी एक ऑडिट करवून घेतलं आहे आणि लवकरच आम्ही त्याचा अहवाल सादर करू. इतक्या वर्षांची आमची चांगले काम करण्याची परंपरा आहे आणि आपण कोणत्याही प्रकारची शंका घेऊ नये. जर काही आढळून आहे तर कायदेशीर कारवाई करून आम्ही शासनाला पूर्णपणे सहकार्य करू. मला आता जावं लागेल. तुम्ही सगळे चहा आणि नाश्ता करून जा. धन्यवाद." हे TV वर पाहून अरुंधती स्वतः शी म्हणाली ' साहेब हि तुमची कदाचित शेवटची प्रेस मीट असेल. सूर्यास्त होणार आहे लवकरच आणि तुम्ही सगळयात जवळचे ग्रह, त्यामुळे त्रास तुम्हालाही होईलच'

*एक म्हणतो " साहेब ३६ ठिकाणं. हे म्हणजे युद्धपातळीवरचं काम होत जातंय. एका वेळी आपण इतकी सगळी ठिकाणं कशी सांभाळणार." दोन म्हणतो " मी प्रयत्न करतोय सगळं जुळवून आणण्याचा. आपल्याया काहीतरी करून एक दोघा मोठ्या ताऱ्यांना गुंतवून ठेवावं लागेल. ते नसल्यामुळे त्यांचे सैनिक काही चुकीचे निर्णय घेऊन आपलं काम सोपं करू शकतात. बघतो मी काही करू शकतो ते" एक म्हणतो " साहेब आता काही दिवस कोणतीही बातमी किव्वा लेख बाहेर येऊ देऊ नका. ते पाच जीन नाहीशे झाले हे जस समोर आलं तर कदाचित ते आपल्याला जाड जाऊ शकतं" दोन म्हणतो " सगळं शांत असेल*

*वादळाआधीसारखं. मी जमलं तर त्यांचं लक्ष दुसरीकडे जावं म्हणून एक वेगळा आणि साधा मुद्दा समोर आणतो. जेणे करून त्यांना वाटेल कि जे होतंय ते त्यांना हवं होतं तसाच होतंय. तू बघ तुला काही विश्वासू लोक मिळतात का ते काही ठिकाणं सांभाळायला, तेवढीच आम्हाला मदत होईल" एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 7. The Setup

जसा जसा एक एक गठ्ठा उघडला जात होता तसा तसा एकंदरीत काळ्या पैशाचा हिशेब उलगडत जात होता. अजून पर्यंत सगळे पैसे देशातच आहेत असं स्पष्ट होत होतं. हेमंतराव साळुंके आणि प्रकाशराव सरदेसाई ह्यांची केवळ नेमणूकच रोख रक्कम हाताळण्यासाठी केली आहे ते स्पष्ट होत होते. त्यांचे केवळ हात पाय नाही तर अख्खे शरीर काळे पैसे घेऊन, घरं खरेदी करून मग ती परत विकायच्या कामात गुंतले होते. ह्या दोघांचे आकडे एकत्र करून जवळपास दहा हज्जार कोटीचे काळ्याचे पांढरे पैसे करायचे दस्तावेज समोर दिसत होते. अनेक जिल्ह्यातल्या बऱ्याच Dreams च्या प्रोजेक्ट्स चे व्यवहार त्या कागदपत्रात होते. सरपोतदार म्हणाले " माझ्या अंदाजाप्रमाणे हे सगळ्यात मोठे real Estate घोटाळ्याचे प्रकरण असेल जर आपण ह्या सगळ्यांना एकत्र ह्यात गोवून पकडू शकलो तर. ह्या सगळ्या उंदरांना एकाच वेळी एका मोठ्या सापळ्यात पकडावं लागेल. एक जरी धागा तुटला तर आपले सगळे प्रयत्न व्यर्थ जाऊ शकतात. सगळ्यात पहिले, ती गाडी आपण का पकडली ते ठरवून मग आपल्याला मासे पकडतांना जाळ्यात मगर कशी सापडली ते सिद्ध करावं लागेल. पकडलेल्या उंदरांपैकी बऱ्याच जणांची तोंडं उघडावी लागतील, त्यांना सरकारी माफीचे साक्षीदार बनवावे लागतील. संध्याकाळी ह्यांना पकडून, माहिती काढून, रात्रभरात जितकी जमेल तितकी रोख रक्कम पकडावी लागेल. आणि मग पुराव्यासकट आपली सगळी शक्ती पणाला लावून सूर्याला तो नाहीसा होण्याआधीच ताब्यात घ्यावं लागेल." ह्यावर अरुंधती म्हणते " आमची

पूर्ण टोळी तयार आहे साहेब. साधारण पन्नास ठिकाणी आपण एकाच वेळी धाड टाकू शकू इतके ऑफिसर्स आणि विश्वासू पोलीस कर्मचारी आहेत आपल्याकडे. लवकरात लवकर त्या पाच जणांची नाहीशी होण्याची खबर कोणालाही कळायच्या आधी आपण पुढे जायला हवं." त्यावर सरपोतदार म्हणाले " ते पाच केवळ भाड्याचे लोक होते आणि त्यांना तसेही एक दोन महिन्यासाठी गायब व्हायला सांगितले गेले होते. आता ते फारच दूर गेले ते त्यांचे दुर्दैव. आपण त्यांना दिलेल्या पैशाने चैन करत असतांना त्यांच्यात कसला तरी वाद झाला आणि चक्क त्यांनी एकमेकांना मारून टाकलं. हे थोडं अनपेक्षित होतं परंतु तुझ्या बातमीमुळे ह्या सूर्यमंडळाची दिशाभूल झाली. जसं आपल्याला वाटतंय कि बरं झालं ते पाच जण गेले तसंच त्यांनाही वाटत असणार. गरज सरो वैद्य मारो म्हणतात ते हेच. नाहीतर आपल्याला त्यांना काही दिवस गुप्त स्थळी हलवावं लागलं असतं. आता तुम्ही सगळे माझ्या इशाऱ्याची वाट पहात सज्ज रहा. तब्येती सांभाळा आणि तय्यार रहा. मेहेतीने बसवलेला Orchestra आता सुरात सादर करायची वेळ जवळ येत आहे"

गोविंद अरविंदकडे पाहून म्हणाला " तुझी लंडनच्या investor ची कल्पना साहेबांना फारच आवडली. आता आपल्याला पूर्ण प्रयत्न करून त्यांना आपलं छान काम दाखवून आपल्या Projects मधे पैसे गुंतवायला लावण्यात आपण यशस्वी झालो कि Dreams ला नव्या वाटेल आणि उंच शिखरावर पोहोचायला कोणीही थांबवू शकत नाही. I am Proud of You my Friend " त्यावर अरविंद म्हणतो " थांब जरा मित्रा. पहिले ते तयार तर होऊ देत. आणि मला वाटतं कि त्यांना नुसतं छान काम न दर्शवता काय काय अडचणी आपण पाहिल्या आहेत आणि त्यांच्यावर आपण कशी मात केली आहे तेही सांगूया. म्हणजे त्यांना आपली वाटचाल खरी

वाटेल आणि आपण केवळ त्यांना चांगल्या चांगल्या गोष्टी सांगून भुलवत नाही आहोत ते कळेल" सुकन्या म्हणते " मला पटतंय. आपण त्यांना जितका पारदर्शीपणा दाखवू तितका विश्वास बसेल त्यांचा आपल्यावर. मुळात त्यांचे पैसे फुकट ना जाता त्यांना फायदा होत असतांना त्यांचे नावही कसे मोठे होईल हेही आपण समजावून सांगूयात. शेवटी पैसे आणि लोकांचा विश्वास हे जर एकत्र मिळाले तर दुधात साखर घातल्यासारखे होईल." त्यावर गोविंद म्हणतो " हे बघा, तुम्हाला जे ठीक वाटेल ते करा. फक्त मला त्यांच्यासमोर फार बोलायला लावू नका म्हणजे झालं. इतकाही पारदर्शीपणा नको कि कंपनीच्या मालकाचे भाषेचे वांधे समोर येतील. " त्यावर दोघेही हसून हसून म्हणतात " काळजी करू नकोस. तू मालक असल्याचं एक फायदा हा कि तू केवळ सही करायलाच हजर असशील. बाकी सगळं आम्ही सांभाळून घेऊ. तू Londan ला आरामात आलास तरी चालेल." त्यावर गोविंद म्हणतो " नाही...मी पण दोन आठवड्यासाठी तुमच्या सोबत येतो. मलाही जरा तिकडचे जीवन कसे असते ते पाहू दे. उद्या मला वारंवार जावं लागलं तर मला तिथे सहजतेने वावरता यायला हवं ना. मी इकडचं सगळं काम हेमंतवर सोपवून पूर्ण लक्ष ह्या कामावर लावतो. आपण जर यशस्वी झालो तर हे कदाचित बाहेरच्या कंपनी ने गुंतवलेले सगळ्यात मोठे भांडवल असेल. मला ह्यात काहीच उणे ठेवायचे नाही. साहेबांच्या ऑफिस मधले हुशार लोक लागले तर तेही आपण सोबतीला घेऊ. वकील, CA, Tax experts अगदी जे लोक हवे आहेत ते सांग. आपण एक टीम बनवून पूर्ण तयारीनिशी जाऊयात." अरविंद म्हणतो " तू म्हणतोस ते बरोबर आहे. मी VP सोबतच्या meetings मधे आपल्या experts ना घेऊन जाइन. सगळं छान

एखाद्या Orchestra सारखं जमवून आणूया. छान सुरात आणि तालात आपलं Proposal सादर करून त्यांच्या Investment ची दाद घेऊया."

गोविंद हेमंत ला भेटून म्हणतो " मित्रा आपल्या नशिबाला बदलणारी चाल आता मी खेळणार आहे. ह्या रोजच्या रोज भीती खाली जगण्याऐवजी आता पांढरे कपडे घालून मागचे सगळे मागेच ठेऊन पुढे नव्या क्षितिजाकडे जायची संधी येतेय असं वाटतंय. अरविंद सोबत जे होतंय ते जर झालं तर तर आपल्या सगळ्यांसाठी जग बदलेल. मला फक्त एक महिना जावं लागेल. इकडचं सगळं तू सांभाळ. मला खात्री आहे तू एकटा संभाळशील. मला काहीही न विचारता आणि सांगता एक महिना काढ." हेमंत म्हणतो " मला खात्री आहे तू करून दाखवशील. तू इकडची काहीच काळजी करू नकोस. रामाने सोपवलेल्या राज्यासारखं हा भरत तुझं राज्य सांभाळेल. आम्हाला तू नेहेमीच सूर्यासारखा प्रकाश दाखवत आला आहेस. आताही तू तेच करशील, मला नक्की माहित आहे. " गोविंद म्हणतो " आपण सूर्य नाही रे. ती जागा साहेबांची. आपण चंद्र. हो पण जे पाऊल आपण घेतोय ते जर नीट पडलं तर आपल्याला सूर्याच्या थोडं दूर राहिलं तरी चालेल. तू काळजी घे, स्वतःची पण आणि Dreams ची पण."

गोविंद, अरविंद, सुकन्या त्यांचा Orchestra घेऊन लंडन च्या विमानाने निघत असतांना इकडे सरपोतदारांचा Orchestra Performance द्यायला सज्ज होतो. २४ ठिकाणी येत्या २४ तासात अनेक माणसं, अनेक ठिकाणी पकडले जातात. पहिल्या ६ तासात माणसं, पुढच्या ६ तासात चौकशी, पुढच्या ६ तासात जिथे जिथे पैसे लपवले आहेत तिथे धाड टाकली जाते. आपलं आयुष्य बदलविण्याची महत्वाकांक्षा घेऊन निघालेला गोविंद, देशात आतापर्यंत उभारलेला

सगळा डोलारा एक एक करत मागवत जात असतो. सूर्यमंडळावर आता फुल्यांऐवजी बरोबरच्या खुणा दिसू लागतात, ज्यांनां ज्यांना ताब्यात घेतलं त्यांच्या फोटोवर...

*एक म्हणतो " साहेब तुमचं अभिनंदन. orchestra आवाज न करताच खूप छान साजरा झाला. " दोन म्हणतो " माझी टीम आहेच खूप छान. आता ह्या सगळ्यांना जे पकडलंय त्यांचं Music ऐकायची वेळ आली आहे. चंद्र चांदणी मधुचंद्रासाठी गेले आहेत त्यामुळे मधला संपर्काचा पूल तूर्तास बंद आहे. ते परत येईपर्यंत आपल्याला सूर्याला भेटून एकदा सूर्या चंद्राची राम भरत भेट घडवून आणावी लागेल. चंद्र जसा स्वतः प्रकाश देत नाही तसाच हा चंद्र देखील केवळ सूर्याची किरणे पसरवत होता आणि म्हणूणच त्याच्या बद्दल काहीच पुरावे हाती लागले नाहीत. आता आपण सूर्याला ग्रहण लावतांना तो चंद्राला ग्रहण लावेल. पहिलावहिला प्रसंग असेल हा. आता तू उगमाच्या दिशेने जाणं सुरु कर. मला असं वाटतं कि तिकडे दुसराच कोणीतरी सूर्य आहे. " एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 8. The Shakeup

अरविंदने आपल्या हुशारीने तब्बल सगळ्या VP आणि CFO ला Dreams मधे पैसे गुंतविण्यात उत्साहित केले होते. त्याने मांडलेला पाच ते दहा वर्षांचा कालविधी Investor साठी किती फायदेशीर आणि अभिमानास्पद असेल ते समजावून सांगितले. CFO म्हणाले कि ते त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर बोलून मतदान करून निर्णय देतील. हे ऐकून गोविंद म्हणतो " अरविद, तू म्हणाला होतास ना कि काही VP इतके उत्साहित नव्हते. मग त्यांना एखाद्या पंचतारांकित ठिकाणी Dinner and Drinks देऊन काही जमतंय का ते पाहूया. त्यांना त्यांचा फायदा लगेचच करून देऊयात." अरविंद लगेचच म्हणतो " गोविंद नाही. अजिबात नाही. कोणत्याही प्रकारे आपण लाच देऊन किंवा पैसे देऊन मत विकत घेतोय असं त्यांच्या समोर येता कामा नये. आपली एक चूक आणि ह्या देशात आपले सगळे व्यवहार बंद होऊन जातील. आपण आत्तापर्यंत सगळं professionally केलंय आणि तसंच पुढेही करत राहूया." हे ऐकून सुकन्या म्हणते " अरविंदचे अगदी बरोबर आहे. इथे घाईत असं काही करणं योग्य नाही. आपण स्वच्छ आणि पारदर्शी व्यवहार करतो असं सांगतांना हे असं करणं म्हणजे आपल्या अनेक वर्ष्यांच्या कामावर पाणी फेरण्यासारखं आहे. आपण वाट पाहूया निर्णयाची. समजा निकाल आपल्या बाजूने नाही लागला तर आपण ज्यांना आपले मुद्दे पटले नाही त्यांना परत एकदा भेटून समजावून सांगूया. CFO ला पुन्हा एकदा मतदान करायला सांगूया. आपलं ROI चं समीकरण छान आहे. मला वाटतं ते हि संधी नाही त्यांचा हातातून जाऊ देणार "

गोविंद म्हणतो "ठीक आहे. आयुष्यात पहिल्यांदा परीक्षेत बसलोय असं झालाय मला. आजवर कधी येणाऱ्या निर्णयाची पर्वा केली नाही पण आता काय निर्णय लागतोय त्याची चिंता मला स्वस्थ बसू देत नाहीये." अरविंद म्हणाला " आपण ह्यावेळी Merit मधे येणार बघ. तू शांत रहा"

ED ने आपल्या जाळयात सापडलेल्या माणसांचे आणि पैशाचे लागेबांधे लावून पैश्याच्या नदीच्या उगमापासून ते Dreams च्या समुद्रात विलीन होईपर्यंत संपूर्ण कालविधीत काय आणि कसं होतं ते मुद्देमालासकट पडताळून पाहिलं. ह्या सूर्यमंडळात प्रत्येक ग्रह आणि ताऱ्यांची भूमिका आणि त्यांचे इतरांशी जोडलेले संबंध आणि त्यांच्यात होणारी देवाणघेवाण हे सगळं आता स्पष्ट झालं होतं. उगमाच्या वेळी ज्यांनी लाच म्हणून पैसे देऊ केले त्याच लोकांना पुढे जाऊन रोख रकमेत घर विकली जात होती. आधी अर्धे पैसे घेऊन, त्यांना हवे ते स्थान मिळून देऊन, म्हणजे मुलाला महाविद्यालयात स्थान, भावाला सरकारी स्थान, स्वतःला शिक्षक म्हणून स्थान किव्वा नातेवाईकांना पोलीस मधे स्थान, मग कागदोपत्री एक एक घर त्यांच्या नावे केले जात असे. मग ते घरं Dreams चे सक्रिय कर्मचारी पुन्हा विकून अखेर Dreams च्या समुद्रात नफा म्हणून जमा करत असत. केवळ ह्या रकमेवर Tax आणि Duty भरून ते सगळे व्यवहार अगदी पारदर्शी आणि कायदेशीर आहेत असे दाखवून कंपनी कशी दर्जेदार आणि फायदेशीर आहे ते समोर आणत असे. कोणत्याही प्रकारचे भांडवल न वापरता उभ्या केलेल्या Projects मधे मात्र ते फारच छान काम करत असत. इमारतींची एकंदरीक रचना, त्यात वापरलेले सामान अगदी सुरेख आणि उत्तम असल्यामुळे राहिवेश्यांनी नेहेमीच Dreams ला कौतुकाची पावती दिली होती. सरपोतदारांना आपण ह्या सूर्यमंडळाचा चांगलाच

नायनाट केला त्याचे समाधान होते. त्यांच्याकडे आता सूर्याला विळखा घालता येईल इतके पुरावे होते आणि त्यांनी स्वतः उपमुख्यमंत्री ह्यांची भेट घ्यायची असे ठरवले.

अरविंद आणि गोविंद ह्यांना हिरवा कंदील मिळाला होता. आता Dreams Royal ची स्थापना करून Premium Quality घरं बांधून ती समाजातल्या श्रीमंत लोकांना विकायची असा पुढचा प्रवास ते मांडत होते. पहिल्या Project च्या भूमी पूजन समारंभाला सगळ्या नामांकित कलाकारांना बोलावून आणि त्यातल्या काहींना बुकिंग करून घेऊन दणक्यात सुरुवात करायची त्यांनी योजना आखली. Investor चे पैसे घेण्याआधी मोठ्या मोठ्या उद्योजकांनी आणि कलाकारांनी केलेली बुकिंग ते इच्छूक गिर्हाईक म्हणून दाखवणार होते जेणे करून Investor काहीही चिंता न करता लगेचच कोट्यावधी Pounds पाठवतील असा त्यांना विश्वास होता.

गोविंद ह्या सगळ्यात व्यस्त असतांना इकडे ED ने आवळलेले जाळे Dreams लाच नष्ट करत आहे ह्याचा त्याला ठावठिकाणाही नव्हता. त्याचे सहकारी आणि घोटाळ्यात समाविष्ट असलेले इतर लोक संपूर्णपणे ED च्या ताब्यात असल्यामुळे गोविंदाचे तारकामंडळ आता कोसळले होते. अरुंधती ह्या सगळ्या प्रकाराला एक मुख्य बातमी म्हणून तयार करीत होती. ती प्रकाशित कधी होईल ते मात्र अजून निश्चित झाले नव्हते.

गोविंदसोबत काम करत असतांना अरविंदला फोन येतो आणि तो फोन उचलून म्हणतो " Yes Sir " त्याचे संभाषण संपल्यावर संशयाने गोविंद त्याला कोणाचा फोन होता असं विचारतो त्यावर तो म्हणतो "अरे तू शाळेत जायचा नाहीस

पण मी जायचो. माझे महाविद्यालयातील शिक्षक होते. त्यांना मी आणि ते मला खूप मान देतात. अखेर त्यांचा आजन्म विध्यार्थी आहे ना मी" अरविंद त्या फोन कॉल नंतर एक्दम हूरुपलेला आणि इकडे सरपोतदार साहेब खूप खुश दिसत होते. अतिशय अभिमानाने त्या सूर्यमंडळाकडे पहात आपला हात त्या मंडळाकडे नेऊन त्याला ग्रस्त केल्यासारखा करून सरपोतदार म्हणतात " now Its time to meet The Sun "

*एक म्हणतो " साहेब सूर्याला भेटायला वरात घेऊन न जाता एकटे का नाही जात. ते पण जेव्हा सूर्य आकाशात असेल. ह्या एका सूर्याने केलेले प्रकार जर आपण सगळ्यां समोर बाहेर आणले तर इतर सूर्यमंडळांना कळेल आणि ते कदाचित सगळं मंडळ तोडून शांत होऊन जातील." दोन म्हणतो " बरोबर बोललास. मी त्याला एकट्याने भेटतो. त्याला संशयही येणार नाही आणि इतरांना काही कळणार देखील नाही. एकदा सगळे हातात आले कि काढूया सळ्यांची वरात एकाच वेळी. तुझं काम कसं सुरु आहे" एक म्हणतो " थोडा वेळ लागतोय पण उगमातून निघाल्याल्या प्रवाहातला प्रसाद नक्कीच सूर्याकडे पोहोचत असेल. मी प्रयत्न करतोय. ह्या सूर्यमंडळात बरीच मध्यम वर्गीय माणसं लुटली जात आहेत. कोण तारे आणि कोण चंद्र ते कळायला वेळ लागेल." दोन म्हणतो "मला इथलं आवरायला वेळ लागेल तोवर आहे वेळ तुझ्याकडे. जसं नाव समोर येईल तसं मला कळव." एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 9. The Sunset

राज्याचे उपमुख्यमंत्री चिंतेत दिसत आहेत. ते फोनवर हळू आवाजात बोलत आहेत " मला तातडीने रोख रक्कम हवी आहे. तुला माहित आहे ना अजूनही काही ठिकाणी पैसे दिले तरच मतं मिळतात. इतक्यात एवढे सारे पैसे कसे काय संपले? साहेबांनी तर पैसे उचलले नाहीत ना काही कामासाठी. तसे असते तर मला नक्कीच सांगितले असते त्यांनी. परीक्षांच्या आणि प्रवेशाच्या हंगामाला अजून ३-४ महिने आहेत. तोवर शांत बसून नाही चालणार. काही तरी तजवीज करावीच लागेल. मी जाऊन साहेबांना भेटून येतो. मला काहीच पत्ता लागू ना देता केवळ साहेब नाहीतर ती चौकडी पैसे घेऊन जात असे ह्या आधी. कालपासून फोन लावून थकलो पण कोणाचं ना फोन लागतोय ना कोणी मला फोन करतोय. काय प्रकार आहे हा सगळा कोण जाणे. मला खूप चिंता वाटायला लागली आहे. मला साहेबांशी बोलायलाच हवं.

सरनाईक मुख्यमंत्र्यांच्या केबिन मध्ये जाऊन त्यांच्याशी बोलतांना दिसतात. दोघेही शांत आणि बराच वेळ चर्चा करत असतात. चहा आणि खाण्यापिण्याच्या पदार्थांना दोघांपैकी कोणीही स्पर्श करतांना दिसत नाही. राज्याचे no १ आणि २ अश्या चर्चेत खूप कमी वेळा दिसतात. साधारण एक तासांनी उपमुख्यमंत्री शांतपणे बाहेर पडून आपल्या गाडीत बसून तिथून निघून जातात.

दुसऱ्या दिवशी अरविंदचा बॉस त्याच्या ऑफिस मधे बसून काही कागद पात्र पाहत असतांना TV वर बातमी येते. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या अचानक राजीनामा दिलाय. काल त्यांनी मुख्यमंत्र्यांची त्यांच्या निवासस्थानी चर्चा केली. आता काही वेळातच ते एक पत्रकार परिषद घेतील त्यात संपूर्ण खुलासा होण्याची शक्यता आहे. काही वेळाने पत्रकारांशी बोलतांना उपमुख्यमंत्री म्हणतात "सगळ्यात पहिले अश्या प्रकारे तुम्हा सगळ्यांना धक्कादायक बातमी देण्यास कारणीभूत झालो म्हणून क्षमस्व. तुम्ही मला सदैव भरभरून प्रेम दिलत आणि आज मी जो कोणी आहे तो केवळ जनतेच्या प्रेमामुळेच आहे. कालच मला माझ्या प्रकृतीला घेऊन एक धक्कादायक बातमी मिळाली आणि त्यामुळे मी पूर्णपणे बरा होण्यासाठी London ला जायचा निर्णय घेतला आहे. रोज काम करत करत कळलेच नाही स्वतःकडे दुर्लक्ष कधी झाले ते. तूर्तास मी Active Politics पासून दूर राहून काही महिने स्वतःसाठी वेळ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मला काय झाले आहे ते काही दिवसात निदान झाल्यानंतर समोर येईलच. तोवर तुम्हा सर्वांना विनंती आहे कि मला आणि माझ्या परिवाराला जरा ह्यातून सावरायला वेळ द्यावा आणि आम्हाला पूर्णपणे Privacy द्यावि. अश्या काळात तुमच्या मनातल्या मनात असणाऱ्या प्रेमाची आणि शुभ चिंतनाची आम्हाला गरज आहे." हा सगळा प्रकार पाहून आबा माईला पाहतात " हे असा अकाली Politics सोडणं म्हणजे नक्कीच काहीतरी मोठा प्रकार असणार. राजीनामा देऊन देशाबाहेर पळून तर जात नाहीयेनं हा. अरविंद देखील London मधेच आहे सध्या. हा सगळा एकमेकांशी जुळलेला तर नाहीये ना." माई म्हणतात " अहो काही तरी काय. तो गेलाय कंपनीच्या कामासाठी. तिथे सरनाईकांचा काय

संबंध? काहीतरी कारण काढून चिडचिड करू नका. चहा आणते. तो घ्या आणि गाणी एका त्या बातम्या ऐकायच्या ऐवजी."

London च्या विमानात सरनाईकांच्या सोबत सरपोतदार शेजारी बसलेले दिसतात. सरपोतदार म्हणतात " तुम्ही राजीनामा देऊन सरकार वाचवलंत ते बरं केलंत. तुमच्या लोभात जनतेला निवडणुकीचा उगाच खर्च कशाला नाही का? त्यावर सरनाईक थोडेसे चिडून म्हणतात "मला फक्त एकाच प्रश्न पडलाय. चिन्मय चा मृत्यू कसा काय झाला?" त्यावर सरपोतदार हसून म्हणतात "म्हणजे चिंगूस ना. त्याचे नाव तुम्ही त्याचा स्वभावावरून गमतीने ठेवलंत पण त्याने ते seriously घेतलं. नावाप्रमाणेच जगात आला तो आणि मेला पण त्यामुळेच. त्याच्यासाठी काम करणाऱ्या त्याच्या team ला पैसे कमी द्यायला लागला तो. हळू हळू त्यांचा राग वाढत गेला. Admissions च्या घोटाळयात मिळालेल्या पैश्यांनी बंगल्यात पार्टी करत असतांना, त्यांनी त्याला खूप दारू पाजली साहेब साहेब म्हणून आणि मग swimming pool मधे नेलं. तिथे त्याचं डोकं पाण्यात दाबून ठेवलं पाण्याखाली. Lungs मधे पाणी जाऊन मेला तो. त्याच्या घरात अश्या गोष्टी होत्या ज्या कायदेशीरपणे विकत घेणं शक्यच नाही. तिथेच आम्हाला पुरावे मिळणं सुरु झालं. आम्ही मोकाट सुटलेल्या त्याच्या टीमच्यामागे माणसं लावली आणि एक एक करत तुमच्या सूर्यमंडळीतले सगळे ग्रह तारे समोर आले. सध्याच्या घडीला तुमचं संपूर्ण सूर्य मंडळ आमच्या ताब्यात आहे, तुमचा चंद्र म्हणजे गोविंद सोडला तर. त्याच्या संदर्भात एकही पुरावा नाही. पण आता सूर्य चंद्र समोर आले कि लंडन ला ग्रहणाचा कार्यक्रम संपूर्ण होईलच. आता अशी अपेक्षा करतो कि तुम्ही मी सांगतोय तसे कराल नाहीतर सगळ्या जनतेला तुम्हाला कोणताही आजार नसून तुम्ही स्वतःच एक

आजार आहेत समाजाला लागलेला ते सांगायला मला काहीच वेळ लागणार नाही." त्यावर सरनाईक म्हणतात "आजवर जे काही केलं ते ताठ मानेनं केलं. आता तुम्हाला पूर्णपणे सहकार्य करून ताठ मानेनीच जगणार आपण." इतक्यात हवाई सुंदरी येऊन त्या दोघांना drinks ऑफर करते. ते दोघेही ग्लास हातात घेऊन चियर्स करून आपले आपले पेय संपवतात.

विमान London ला पोहोचते आणि सरपोतदारांचा उदास चेहेरा समोर येतो. बाजूला सरनाईक ह्यांच्या शरीराभोवती Medical Staff दिसतो. ते पूर्ण प्रयत्न करतात त्यांना वाचविण्याचा परंतु सरनाईक त्याआधीच गतप्राण झालेले असतात. सरपोतदार विचार करतात " ह्याचा असा अंत अपेक्षित नव्हता. आता चंद्र ग्रहण कायमचे हुकले असा म्हणायला हरकत नाही..एवढं सगळा सुरळीत पार पडूनही शेवटी एक धागा तुटलाच. " ते फोन लावतात आणि त्यांना आवाज ऐकू येतो...." Yes Sir......"

*एक म्हणतो " साहेब सूर्याला ग्रहण लावता लावता संपलाच कि तो. तुम्हाला काय वाटतं तो कसं गेला असेल." दोन म्हणतो " निदानाप्रमाणे हृदयविकाराच्या झटक्याने गेला तो. हे सगळं अचानक समोर आल्यानंतर धक्का लागणं स्वाभाविक आहे ना? " एक म्हणतो " एका दृष्टींनी बरेच झाले. आता तुम्ही चंद्राला तुमच्या टीम मध्ये सामावून घेऊ शकता. तो एकतर तुम्हाला मदत करायला तयार होईल नाहीतर आत्महत्या करेल. इतका कमकुवत*

*तर नाही वाटत तो कि आत्महत्या करेल. बघा प्रयत्न करून" दोन म्हणतो " बघूया प्रयत्न करून. मला माझी माणसं दुसऱ्या बाजूला असतील तर चालतात. तिकडची माणसं आपलं मंडळात येणं म्हणजे जरा कठीण आहे. जितके दिवस त्याच्याकडून माहिती मिळेल तितके दिवस ठेऊया आणि मग देऊया कायद्याच्या हातात." एक म्हणतो " साहेब सूर्य नंबर एक ला भेटला आणि मग त्याने राजीनामा दिला ह्यात काही वावगं नाही वाटत तुम्हाला" दोन म्हणतो " होऊ शकतं कि सूर्य हेच सांगायला गेला असेल कि त्याला कंटाळा आलाय आता आणि Early Retirement हवी असेल. नंबर एक नि मग तब्येतीचं कारण सांगून सुट्टी घ्या असं सांगितलं असेल. तुला जर ह्यात काही वावगं वाटत असेल तर तू घे शोध." एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

# 10. The Secret

अरविंद आणि अरुंधती एकमेकांकडे अभिमानाने पहात सरपोतदारांच्या ऑफिस मधे येतात. तिथे अजून ६-७ जण आधीच हजर असतात. ते सगळे आणि सरपोतदार टाळ्या वाजवून त्यांचं अभिनंदन करतात. "सरनाईकांची सोलर सिस्टिम तर आता संपली" सरपोतदार फलकाकडे पाहून म्हणतात. जवळ उभे असलेले दोन जण सगळे फोटो आणि इतर गोष्टी एक एक करून काढत एका बॉक्स मधे ठेऊ लागतात.अरविंद म्हणतो "सर, त्या गोविंदला जाऊ द्या. इतकं सगळं झाल्यावर तो नाही ह्या अश्या कामांच्या फंदात पडणार आता. मी त्याला FDI पूर्ण सेट करून दिलं आहे. Dreams खूप मोठी कंपनी आहे. ती डबघाईस आली तर बऱ्याच जणांचं नुकसान होईल. Dreams Royal पूर्णपणे स्वतंत्र असेल आणि त्यांचे व्यवहार Investor असल्यामुळे स्वच्छ ठेवावेच लागतील. मला पूर्ण खात्री आहे कि गोविंद ती चांगली सांभाळेल. जेव्हा राजा पडतो तेव्हा प्रजा पडते तो काळ गेला आता. आता प्रजा स्वावलंबी आहे आणि जोवर गोविंद आहे तोवर सरनाईकांची अनुपस्थिती Dreams मधे जाणवणार नाही. तुम्ही त्याला विश्वासात घ्या. Seat Scam च्या सूर्यमंडळातील ग्रह तारे आता मांडायला सुरुवात करूया आपण. आपल्या मंडळाने जसे सरनाईकांच्या मंडळाला ग्रासले तसे आता ह्या मोठ्या मंडळाला देखील ग्रासू शकू. इतके सगळे बोगस सर्टिफिकेट्स आणि डिग्रीस कश्या दिल्या जातात आणि पैसे कुठे आणि कसे दिले घेतले जातात ते कळायला आपल्याला गोविंदला आपल्या बाजूला ठेऊन माहिती गोळा करावी लागेल. मी त्याच्यासोबत Dreams मधे रुजू राहतो आणि पुढची आखणी करत राहतो." सरपोतदार म्हणतात " ठीक आहे. काही गडबड झालीच तर त्याच्या मुसक्या

आपल्या मुठीत आहेतच. अरुंधती तू एक पुस्तकच लिहायला घे,लेख कमी पडेल इतकं सगळं समोर आणायला. अर्धी Story आहे आपल्याकडे आता अर्धी नव्या सूर्यमंडळातून समोर येईलच. लोकांना कसे सर्रास फसवले जाते, एकदा नाही तर दोन दोन वेळा... हे सगळं प्रकरण पुढे आले कि लोक जरा सांभाळून पैशाचे व्यवहार करतील " अरविंद हे ऐकत अरुंधती कडे पहातो. त्यांच्यातलं एकमेकांवरचं प्रेम डोळ्यात अगदी स्पष्ट जाणवतं. सरपोतदार म्हणतात " तुम्हाला दोघांना एकत्र पाहिलं कि वाटतं अरविंदला बोलावून घ्यावं आणि तुम्हाला एकत्र काम करायला वेळ द्यावा" त्यावर अरुंधती म्हणते " काय तुम्ही सर. आम्हाला तुमच्यासोबत काम करायला मिळतं तेच खूप आहे. तसेही अरविंदला आता कोणीतरी भेटली आहे ना." त्यावर सरपोतदार म्हणतात " हा हा हा...म्हणजे Mrs गोविंदराव का? " त्यावर अरुंधती गोंधळून बघू लागते. अरविंद म्हणतो " सुकन्या गोविंदची बायको आहे. मला हे माहित होतं. कारण तिला मी लहानपणी गोविंदसोबत बरेचदा पाहिलं आहे. तुला इतकं गोंधळायला काय झालं. तुला माहित आहे ना..साहेब आणि तू ह्याशिवाय माझं लक्ष इतर कुठेही भटकत नाही." त्यावर ते तिघेही हसून नव्या कोऱ्या फलकाकडे पाहू लागतात.

गोविंद आणि सुकन्या एकत्र सरनाईकांच्या घरी त्यांच्या परिवाराला भेटायला जातात. सरनाईकांचं जाणं आणि एकंदरीतच सगळ्या काळ्या बाजारातल्या कारभाराची झालेली कोलमड पाहून त्यांना दुःखही होतंय आणि आश्चर्य देखील वाटत आहे. ह्या सगळ्यात आपण पूर्णपणे सामील असतांना केवळ आपणच कसे काय अलगद बाहेर पडलो तेच त्यांना समजेना. विचार करता करता गोविंदला अरविंदचा फोन येतो. " मित्रा अभिनंदन. Dreams Royal आता

पायावर उभी राहणार तर. पार्टी कधी देणार " गोविंद म्हणतो " तू घरी ये. आपण निवांत बोलूया."

अरविंद गोविंदच्या घरी जातो. तिथे सुकन्या आणि गोविंदला एकत्र नवरा बायकोसारखं पाहून अरविंद आश्चर्यचकित झाल्यासारखं दाखवतो. गोविंद म्हणतो "मित्रा तुला मी सांगणारच होतो कि आम्ही पती पत्नी आहोत ते. आपल्या कामात नवीन लोकांवर जरा बारकाईने लक्ष ठेवावं लागत म्हणून मी सुकन्येला तुझ्यावर लक्ष ठेवायला सोबत काम करायला सांगितलं होतं. त्यावर अरविंद म्हणतो "मी समजू शकतो. मला असं वाटत होतं कि सुकन्या आपल्या गावातलीच मुलगी आहे असं." त्यावर सुकन्या म्हणते "आरु तू बरोबर ओळखलस. मी गण्यासोबत काम करायचे साहेबांच्या पार्टीसाठी. तुझ्या भावना दुखावल्या बद्दल माफ कर आम्हाला. ' त्यावर अरविंद म्हणतो "काही हरकत नाही. मी तुला नेहेमीच फक्त एक ऑफिस मधली मैत्रीण म्हणूनच समजत आलोय. मी ठीक आहे. चिंता नको करुस. तुम्हा दोघांनांनी पुढच्या वाटचालीबद्दल खूप खूप शुभेच्छा. मी आता विचार करतोय कि दुसऱ्या एखाद्या कंपनी मधे नोकरी शोधावी. " त्यावर लगेचच गोविंद म्हणतो " मित्रा साहेब गेले आता तू तरी नको जाऊस. मला आणि Dreams ला तुझी फार गरज आहे. पुढची काही वर्षे फार महत्वाची आहेत. तू इथे असलास तर मला खूप आधार होईल." त्यावर अरविंद म्हणाला " बरं. पण एका अटीवर. पहिल्या प्रोजेक्ट च्या उदघाटनाला सरपोतदार साहेबांना बोलवायचं. चित्र तारकांना नाही. सध्या ते खूप नावाजलेले आहेत. त्यांनी एक खूप मोठे प्रकरण मोडीस काढून अनेक पैशांचा काळाबाजार उघडकीस आणला आहे. " गोविंद सुकन्याकडे घाबरून बघत म्हणतो "तू म्हणशील तसं. पण ते तयार होतील का?" त्यावर अरविंद म्हणतो "मी बोलून

पाहतो त्यांच्याशी. मला वाटतं ते तयार होतील. आपण जर लंडन चे investor आणू शकतो तर त्यांना convince करणं नक्कीच जमू शकेल."

अरविंद सरपोतदारांशी संपर्क साधून, गोविंद सुकन्या सोबत त्यांच्याशी फोन वर बोलतो. सरपोतदार साहेब म्हणतात " मी काही कोणी Celebrity नाही. मला का बोलावताय." त्यावर अरविंद म्हणतो " साहेब आमची कंपनी खूप चांगलं काम करत आहे. आम्हाला आता London च्या investor कडून पैसे मिळाले आहेत. विश्वास ठेवा. तुमच्या येण्याने आमची प्रतिमा अजून चांगली होईल आणि तुम्हाला देखील आमचं पुढच्या पाच वर्षांचं काम पाहून अभिमान वाटेल." त्यावर सरपोतदार म्हणतात " गोविंदराव मी तुम्हाला मदत करतो. तुम्ही मला मदत कराल का माझ्या एका कामात? " गोविंद म्हणतो " अहो काय लाजवताय साहेब. हुकूम करा. मी सगळ्या प्रकारे मदत करतो." सरपोतदार म्हणतात " गोविंदराव कानाला फोन लावा." गोविंद फोन घेऊन दूर जातो आणि फोनवरचं बोलणं ऐकून त्याचा चेहेरा पांढरा पडतो. तो थरथरत्या आवाजात म्हणतो " तुम्हाला मी सगळी मदत करतो. मला ह्यातून बाहेर काढा साहेब" सरपोतदार म्हणतात " तुम्ही बाहेरच आहात आणि तेही आमच्या मर्जीने. तुम्ही काय काय केलंय त्याचे पुरावे आणि तुमची माणसं सगळंच आहे माझ्याकडे. तुम्ही आम्हाला Seat घोटाळयाच्या चक्रवयूव्हाच्या आत जायला आम्हाला मदत करा, आम्ही तुम्हाला बाहेरच ठेऊ. " गोविंद लगेच म्हणतो " नक्कीच साहेब. तुम्ही म्हणाल तसं" सुकन्या त्याचा चेहेरा पाहून घाबरून जाते. अरविंद हलकेच हसून आणि मग गंभीर होऊन गोविंद ला म्हणतो "सगळं ठीक आहे ना?" गोविंद म्हणतो "साहेब त्यात आहेत. ह्यापुढे सगळं कायदेशीर करायचं आपण."

प्रोजेक्ट च्या उदघाटनाच्या वेळी सरपोतदार गोविंद शी मधे मधे चर्चा करतांना दिसतात. त्या दोघांच्या हस्तांदोलनाचा फोटो गोविंद London च्या टीम पाठवून म्हणतो. " We have law on our side too "

*एक म्हणतो " साहेब तुमच्या Solar Eclipse मधल्या सूर्याचा पत्ता लागला. फोटो पाठवलाय" दोन म्हणतो "नक्की ना. नंबर एक." एक म्हणतो " हो साहेब, नक्की नसलं तर सांगितलंच नसतं ना तुम्हाला. नंबर एक आणि नंबर दोन ची जी भेट झाली त्याची माहिती काढली मी, त्यात समजलं हे " दोन म्हणतो " ठीक आहे. तुला तुझे पैसे मिळतील. अजून काही लागे बांधे लागतात का ते सांग. सूर्य जर हा असेल तर आपल्याकडे जो आधीच चंद्र आहे त्याला बरेच काही माहित असेल. त्याला कमल लावूया आता" एक म्हणतो " साहेब मी म्हटलं होता ना चंद्राला आपल्या बाजूला आणा. आता परत तयारीला लागूया. नवीन जाळं. नवीन मासे आणि मोठ्ठी मगर" दोन म्हणतो " तू शोध सुरु ठेव आणि कळव काही फोटो आणि माहिती मिळते का तर." एक म्हणतो " हो साहेब. करतो तुम्हाला फोन मी."*

सरपोतदारांच्या ऑफिस मधे अरविंद आणि अरुंधती नव्या सोलर सिस्टिम वर काम करतांना दिसतात. त्यात सूर्याच्या जागी फोटो असतो मुख्यमंत्री श्री विश्वासराव पाटील ह्यांचा.

पुढील कथा लवकरच

आपले अभिप्राय कळवा

मिलिंद कपाळे

***फोन :*** *+९१- ८३९०४०५८००*